## महिलांना बळ! पिंक ई-रिक्षा योजनेच्या अनुदानात दुप्पट वाढ

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने राज्यातील स्त्रीशक्तीला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी आणि महिला उद्योजकतेला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्यासाठी चालवलेल्या विशेष उपक्रमात अत्यंत महत्त्वाचे बदल केले आहेत. पिंक ई-रिक्षा या महत्त्वाकांक्षी योजनेच्या नियमावलीत सुधारणा करण्यात आली असून या अंतर्गत मिळणाऱ्या आर्थिक मदतीचा वाटा थेट दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांच्या हाताला हक्काचा आणि कायमस्वरूपी रोजगार मिळवून देणाऱ्या या योजनेत पूर्वी केवळ २० टक्के असणारे शासकीय अनुदान आता वाढवून ४० टक्के इतके करण्यात आले आहे. राज्याच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी महिला भगिनींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा विस्तार आता अधिक व्यापक पद्धतीने केला जात आहे.




रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक ३५७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ बुधवार, १५ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


मच्छीमारांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक संपर्क व्यवस्था/२

ऐरोलीत पतीची मर्डर मिस्ट्री ११ महिन्यांनंतर उघड/६

पंच परीक्षेत रायगडातील ११ जण उत्तीर्ण/८


# आणखी २३ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी!

## योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.१४) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील शेतकरी, पायाभूत सुविधा आणि नागरी विकासाच्या दृष्टीने अनेक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये सर्वाधिक मोठा दिलासा राज्यातील बळीराजाला मिळाला असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

नव्या सुधारणेनुसार २०१९च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठी लावण्यात आलेली ५० हजार रुपयांपर्यंतची कर्ज मर्यादेची अट आता पूर्णपणे रद्द करण्यात आली असून त्यांना नियमित कर्जमाफीचा लाभ दिला जाईल. याशिवाय सन २०२६-२७मधील नियमित कर्ज परतफेडीची अटही सरकारने शिथिल केल्यामुळे राज्यातील आणखी २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पालघर जिल्ह्यातील दापचरी (ता. डहाणू) येथील दुग्ध प्रकल्पाची तब्बल ५५८.४३ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळास देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या विस्तीर्ण जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा अत्याधुनिक कृषी बाजार उभारण्यात येणार असून विविध पणनविषयक सुविधा निर्माण केल्या जातील. याचा फायदा स्थानिक शेतकऱ्यांना होणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या (एसटी) राज्यभरातील



अतिरिक्त जागा आणि बसस्थानकांचा कायापालट केला जाणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील बसस्थानकांचा व महामंडळाच्या मोकळ्या जागांचा व्यावसायिक विकास करण्यास गृह व परिवहन विभागाने मान्यता दिली आहे.

बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांना क्रीडा विभागातर्फे मंजुरी देण्यात आली आहे. महिला व बाल विकास विभागांतर्गत अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८नुसार मुक्तबंदी व परिविक्षाधीन बंदी यांना देण्यात येणाऱ्या सहाय्यक अनुदान योजनेच्या रकमेत थेट दुप्पट वाढ करण्यात आली आहे. आता हे सहाय्यक अनुदान २५ हजार रुपयांवरून थेट ५० हजार रुपये करण्यात आले असून यामध्ये न्यायालयातून निर्दोष सुटलेल्या बंद्यांचाही नव्याने समावेश करण्यात आला आहे. याखेरीज महसूल व वन विभागाच्या वतीने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३मध्ये आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी नवे मुद्रीकरण धोरण

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती) मालमत्तांसाठी नवीन मुद्रीकरण धोरण मंजूर करण्यात आले आहे. या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या मालमत्तांच्या वापरातून पारदर्शक पद्धतीने आणि अल्पकालीन व दीर्घकालीन नियोजनातून उत्पन्नाचे नवे व अधिक चांगले स्रोत निर्माण करता येतील. शहरांच्या दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी राज्यात केंद्र शासन पुरस्कृत 'अर्बन चॅलेंज फंड' अभियान राबविण्याचा निर्णय नगर विकास विभागाने घेतला आहे. या अभियानामुळे शहरांना विकासकामांसाठी बाजाराधारित वित्तपुरवठा (मार्केट लोन व रोखे) मिळवणे सुलभ होणार आहे.

## बांधकाम कामगारांना मिळणार आर्थिक मदत

**शासन निर्णय जारी**

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुती सरकारने राज्यातील बांधकाम कामगारांसाठी आर्थिक मदतीची मोठी घोषणा केली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे असंघटित आणि कामगारांना मोठा दिलासा मिळेल. यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

सरकारी निर्णयानुसार आता कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना तीन लाख ५० हजार रुपयांची मदत मिळेल. अपघाती मृत्यू झाल्यास कुटुंबाला सहा लाख ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल. कामावर असताना अपघात झाला आणि त्यात अपंगत्व आले तर दोन लाख रुपयांचे सहाय्य शासनाकडून देण्यात येईल. यासह शरीराची कार्यक्षमता घटल्याने काम न मिळाल्यास कामगारांना निवृत्तीवेतन दिले जाणार आहे. महिला बांधकाम कामगारांच्या मातृत्व लाभात मोठी वाढ करून त्यांना २५ हजार रुपयांची मदत केली जाणार आहे.

बांधकाम कामगार मंडळात नोंदणी असलेल्यांना हा लाभ दिला जाईल, अशी माहिती राज्याचे कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी यासंदर्भात बोलताना दिली.


## पेणमध्ये चिमुकलीवर अत्याचार करून खून

### नराधम तरुणाला अटक

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील पाटणेश्वर गावालगत असलेल्या आदिवासी वाडीतील पाच वर्षीय मुलीचे अपहरण व लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी नराधम तरुणाला अटक केली आहे.

याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिलेल्या माहितीनुसार सागर वाघमारे यांची पाच वर्षीय



मुलगी रिया ही १३ जुलै रोजी रात्री ८.३० वाजल्यापासून बेपत्ता असल्याची तक्रार पेण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

पोलिसांनी श्वान पथकासह तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता घरापासून १०० मीटर अंतराच्या परिसरात रियाचा मृतदेह नग्नावस्थेत आढळून आला. तिच्यावर लैंगिक अत्याचार करून खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी आरोपी किरण भिकू वाघमारे (२४) याला पोलिसांनी अटक केली.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप भोसले उपस्थित होते. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## देवकुंड दुर्घटनेनंतर २५ जणांवर गुन्हे दाखल

■ माणगाव पोलिसांची मोठी कारवाई

**माणगाव : प्रतिनिधी**

भिरा येथील देवकुंड धबधब्यात बुडून दोन पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर माणगाव पोलिसांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. या प्रकरणात एकूण २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींमध्ये मृत पर्यटकांसोबत आलेले सहकारी, स्थानिक गाईड तसेच पर्यटकांकडून पैसे घेऊन बुकिंग करणाऱ्या व्यक्तींचा समावेश असल्याची माहिती माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय बांगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देवकुंडसह प्रतिबंधित इतर पर्यटनस्थळ फिरविण्याचे आमिष दाखवून बेकायदेशीर बुकिंग करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. बंदी आदेशाचे उल्लंघन करणारे पर्यटक, स्थानिक गाईड, संशयित व्यक्ती अशा सगळ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## पोलादपुरातील ओंबळी येथे जमिनीला भेगा

■ प्रशासनाकडून पाहणी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील ओंबळी येथील डोंगर उतारावरील जमिनीला साधारणपणे ५० ते ७० मीटर लांबीच्या, एक ते दोन फूट रुंदीच्या आणि दीड ते तीन फूट खोल भेगा पडल्या. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागातील ओंबळी येथे उतारावरील ओढ्यालगत भेगा पडल्या आहेत. याबाबत सरपंच रूपाली चिकणे यांनी पंचायत समितीच्या आपत्ती निवारण व्यवस्थापनाला कळविले. या घटनेची माहिती मिळताच सभापती अविनाश शिंदे यांनी परिस्थितीची पाहणी केली तसेच पंचायत समितीचे ग्रामपंचायत विस्तार अधिकारी चिमाजी हंबीर आणि बांधकाम विभागाचे शाखा अभियंता कांबळे यांना घटनास्थळी पाहणी करण्यासाठी पाठविले.

यावेळी सरपंच रूपाली चिकणे, दिलीप चिकणे, अतिश चिकणे तसेच ग्रामस्थांनी उपस्थित राहून जमिनीवरील भेगा दाखविल्या. दोन्ही अधिकाऱ्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, यापूर्वी देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील नाणेघोळ गावाजवळील डोंगरात जमिनीला भेगा पडल्या होत्या. तेथील ग्रामस्थांचे प्रशासनाने स्थलांतर केले आहे.

## निवडक

### होर्मुझ स्ट्रेटमध्ये नाविकाचा मृत्यू; भारताने इराणला बजावले समन्स

**नवी दिल्ली :** इराणच्या होर्मुझ सामुद्रधुनीत संयुक्त अरब अमिरातीच्या (युएई) तेलवाहू जहाजांवर झालेल्या हल्ल्यात एका भारतीय नाविकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर केंद्र सरकारने कठोर पाऊल उचलत नवी दिल्लीतील इराणी दूतावासाला समन्स बजावून स्पष्टीकरण मागितले आहे. भारतीय अधिकाऱ्यांनी समुद्रात काम करणाऱ्या भारतीय समुदायाच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

### बलुचिस्तान पाकिस्तानपासून स्वतंत्र? पत्रक व्हायरल

**कराची :** बलुचिस्तानने पाकिस्तानला धक्का देत स्वतःची स्वतंत्र देश म्हणून घोषणा केली आहे. बलुचिस्तानकडून करण्यात आलेल्या या घोषणेचे एक पत्रक सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. यात बलुचिस्तानने ८५ टक्के भूभागावर नियंत्रण मिळवल्याचा दावा केला आहे. याशिवाय वेगळे राष्ट्रीय गीत, राष्ट्रीय ध्वज, स्वतःचे राष्ट्रीय चलन (बलोची फालूस) निर्माण केल्याचे या पत्रकात नमूद करण्यात आले आहे. बलुचिस्तानने स्वतःच्या संरक्षण दलाचीदेखील घोषणा केली आहे.

## माथेरानच्या जंगल भागात बिबट्याचा वाढता वावर

### श्वानावर झडप, थरारक घटना सीसीटीव्हीत कैद



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिक आणि पर्यटकांमध्ये पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हनीमून पॉइंट परिसरात रात्रीच्या सुमारास बिबट्याने एका श्वानावर झडप घातल्याची थरारक घटना घडली असून हा संपूर्ण प्रकार येथील दुकानाबाहेर बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

काही महिन्यांपूर्वी नेरळ परिसरातील कुंभे-आंबिवली भागात बिबट्याचे दर्शन झाले होते. त्याच परिसरात एका मेंढपाळाची मेंढरेही बिबट्याने फस्त केल्याची घटना घडली होती. १४ एप्रिल रोजी माथेरान घाटरस्त्यावर रात्रीच्या वेळी एका टॅक्सीचालकाला बिबट्याचे दर्शन झाले होते. याशिवाय सनसेट पॉइंटच्या खालच्या बाजूला बिबट्याने एका श्वानाची शिकार करून त्याला ओढत नेत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी पाहिल्याची माहिती समोर आली होती. माथेरान घाट रस्त्यालगतच्या जंगल परिसरातही एका आदिवासी बांधवाला बिबट्याचा मुक्त संचार दिसून आला होता. त्यानंतर वन विभागाने संबंधित भागाची पाहणी केली असता डोंगर परिसरात एक मादी बिबट्या व तिची दोन पिल्ले असा तिघांचा वावर असल्याचा अंदाज आहे.

पाण्याच्या शोधात बिबटे सनसेट पॉइंटच्या खालच्या भागासह इतर जलस्रोतांकडे येत असल्याचे तसेच गारबट वाडीच्या खालच्या बाजूला असलेल्या दगडी कपारींमध्ये त्यांचा अधिवास असण्याची शक्यता वन विभागाने व्यक्त केली आहे. **(पान २ वर..)**

## यशाने हुरळून आणि अपयशाने खचून जाऊ नका -सुभाष बोरसे

### सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक संकुलात विद्यार्थी गुणगौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यश-अपयश हे शूरांचे वाटेकरी असतात. म्हणूनच विद्यार्थ्यांनी यशाने हुरळून आणि अपयशाने खचून जाऊ नये. स्वप्न, मेहनत, सातत्य, आत्मविश्वास आणि श्रद्धा या पंचसूत्राने आयुष्यात सतत प्रगती करा तसेच शिक्षकांनीही अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना घडवून शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखावी, असे मार्गदर्शन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई विभागीय मंडळाचे अध्यक्ष सुभाष बोरसे यांनी केले.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक संकुलात सोमवारी (दि.१३) संस्थेचे श्रद्धास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोरसे बोलत होते.

आईवडील आपल्याला जी शिक्षा करतात तिचे रूपांतर हमखास यशात होत असते, असे त्यांनी सांगून सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

लोकनेते रामशेठ ठाकूर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, आमचे वडील फक्त दुसरी इयत्ता शिकलेले होते. तरीही त्यांनी आमच्यावर चांगले संस्कार केले. तुम्हीदेखील मेहनत घेऊन आयुष्य घडवा. तुम्हाला मिळालेल्या बक्षिसाचे सातत्य टिकवून ठेवा. कितीही मोठे झालात तरी आईवडील, गाव व शाळा यांना कधीही विसरू नका, असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी मनोगतात शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे या उदात्त विचाराने प्रेरित होऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय आणि प्रेरणादायी आहे. ज्ञान, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा निर्माण करत त्यांनी उभारलेले शैक्षणिक विश्व हे विद्यार्थी, शिक्षक आणि समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरले आहे, असे विचार व्यक्त केले.

उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. स्व. चांगू काना ठाकूर अर्थात पिताश्री सर्वांसाठी प्रेरणास्रोत आहेत. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ३५ वर्षांपूर्वी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रूपाने शिक्षणरूपी दिवा प्रज्वलित केला. व्यक्तीचा प्रयत्न प्रामाणिक असेल व हेतू शुद्ध असेल तर यश हमखास मिळतेच, असे ते म्हणाले.

कार्यक्रमास नगरसेविका राजश्री वावेकर, डॉ. अस्मिता घरत, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. राहुल घरत, आदेश ठाकूर, **(पान २ वर..)**

## घेरा माणिकगड आदिवासीवाडीतील कुटुंबांना मदतीचा हात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जांभिवली ग्रामपंचायत हद्दीत घेरा माणिकगड आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या एकमेव रस्त्यावरील साकव नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसाने वाहून गेला. त्यामुळे माणिकगडवाडीचा संपर्क तुटून तेथील आदिवासी नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. या गंभीर परिस्थितीची पनवेल पंचायत समितीच्या शिष्टमंडळाने तत्काळ दखल घेत घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच त्यांनी केलेल्या सूचनेनुसार ग्रामपंचायतीकडून आदिवासी, गरीब व गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना सदाशिव वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, जांभिवली ग्रामपंचायतीचे प्रशासक तथा विस्तार अधिकारी सौ. वैदू, ग्रामपंचायत अधिकारी अर्चना देशमुख, माजी ग्रामपंचायत सदस्य जान्हवी जयंत कोंडिलकर, हरिश्चंद्र वाघ तसेच जयंत कोंडिलकर, काशिनाथ निकम, कृष्णा कोंडीलकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी ग्रामपंचायतीच्या १५ टक्के मागासवर्गीय खर्चामधून जीवनावश्यक किराणा साहित्य संबंधित ४१ कुटुंबांपर्यंत पोहचवण्यात आले. नैसर्गिक आपत्तीच्या काळात जांभिवली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रशासनाने त्वरित मदतीचा हात पुढे केल्यामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, वाहून गेलेल्या साकवाच्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करून नवीन साकव किंवा पुलाचे काम हाती घेण्यात येईल, असे आश्वासन सभापती रंजना वास्कर यांनी दिले.

## पर्यटकांवर हल्ला; आरोपींवर गुन्हा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकच्या इगतपुरी तालुक्यातील भावली धबधबा परिसरात भ्रमंतीसाठी गेलेल्या पर्यटकांवर हल्ला करून नंतर १० ते १२ किलोमीटर पाठलाग करीत त्यांच्या वाहनाची तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात नाशिक ग्रामीण पोलिसांनी नऊ संशयितांना ताब्यात घेतले आहे.

नाशिक शहरातील एक कुटुंब रविवारी आठ सदस्यांसह भावली धरणावर फिरण्यासाठी गेले होते. फिरून झाल्यानंतर घरी परतत असताना कुटुंबातील एका महिलेची दोन टवाळखोरांनी छेड काढली. याचा जाब विचारला असता टवाळखोरांनी वाद घालत हुल्लडबाजी व पाठलाग करून मारहाणही केली.

**खारघर : पनवेल महापालिकेच्या महापौरांसाठी साकारत असलेल्या निवासस्थानाच्या कामाची मंगळवारी पाहणी करण्यात आली. यावेळी महापौर नितीन पाटील, सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक परेश ठाकूर, प्रवीण पाटील, मधु पाटील, नगरसेविका रूचिता लोंढे यांच्यासह अधिकारी, सल्लागार आदी उपस्थित होते.**





# मच्छीमारांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक संपर्क व्यवस्था उभारणीवर भर -ना.राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारी करताना कोणत्याही परिस्थितीत किनाऱ्याशी संपर्क साधता यावा, आपत्कालीन प्रसंगी तात्काळ मदत मिळावी आणि हवामान तसेच सुरक्षा सूचना वेळेवर प्राप्त व्हाव्यात, यासाठी सॅटेलाईट फोन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्यव्यवसाय विभागाने भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करून बीएसएनएल ग्लोबल सॅटेलाईट फोन सर्व्हिसची माहिती घेतली असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.




मंत्रालयात आयोजित बैठकीस मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, बीएसएनएलचे वरिष्ठ व्यवस्थापक सुहास मानकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या 'मच्छिमार सुरक्षा प्रथम' या धोरणानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देण्यात येत असून, सॅटेलाईट फोन सुविधा उपलब्ध झाल्यास राज्यातील खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना मोठा दिलासा मिळणार आहे. या उपक्रमामुळे समुद्रातील संप्रेषण अधिक सक्षम होण्यासोबतच मच्छिमारांचा आत्मविश्वास वाढेल आणि मत्स्यव्यवसाय अधिक सुरक्षित व आधुनिक करण्याच्या दिशेने महाराष्ट्र आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे म्हणाले, "राज्यातील मच्छिमारांचे प्राण आणि उपजीविका सुरक्षित ठेवणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. खोल समुद्रात मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत सॅटेलाईट फोन सुविधा मच्छिमारांसाठी जीवनदायी संपर्क व्यवस्था ठरेल. बीएसएनएलच्या सहकार्याने ही सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मक असून, यामुळे समुद्रातील सुरक्षा, बचावकार्य आणि संप्रेषण अधिक प्रभावी होईल, असे राणे यांनी सांगितले.

यावेळी बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांनी ग्लोबल सॅटेलाईट फोन सर्व्हिसचे सादरीकरण करून या तंत्रज्ञानाची कार्यपद्धती, उपलब्ध सुविधा, कव्हरेज, उपकरणांची वैशिष्ट्ये तसेच खोल समुद्रात संपर्क राखण्यासाठी त्याची उपयुक्तता याबाबत माहिती दिली.सॅटेलाईट फोनद्वारे मोबाईल नेटवर्क नसलेल्या समुद्रातील दुर्गम भागातही सातत्यपूर्ण संपर्क साधता येतो. त्यामुळे खराब हवामान, यांत्रिक बिघाड, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती किंवा इतर संकटांच्या वेळी तात्काळ मदत मागविणे शक्य होते. तसेच मत्स्य नौकांचा किनाऱ्याशी संपर्क कायम राहिल्याने बचाव यंत्रणेला जलद प्रतिसाद देणे सुलभ होणारअसल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

## पेण अर्बन बँक ठेवीदारांच्या कर्जतमधील बैठकीत महत्त्वाचे निर्णय

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँक बंद पडून तब्बल १५ वर्षे होत आली तरी हजारो ठेवीदारांना त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टाच्या पैशांची प्रतीक्षा कायम आहे. बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अडकून पडल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक नियोजन विस्कळीत झाले. या पार्श्वभूमीवर पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीची वार्षिक बैठक पार पडली. बैठकीत ठेवीदारांनी एकमुखाने महत्त्वाचे ठराव मंजूर करत पाच लाख रुपयांच्या विमा संरक्षणाचा निर्णय घेतला.



पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीच्या बैठकीचे आयोजन अंबामाता सभागृहात करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष शिरीष बिवरे, सचिव चिंतामण पाटील, प्रदीप शहा, अनिल बोभाटे, मोहन सुर्वे, विश्वास बोराडे, संतोष चौधरी आदी उपस्थित होते. पेण अर्बन बँक २३ सप्टेंबर २०११ रोजी आर्थिक संकटात सापडून बंद पडली. त्यानंतर सुमारे १ लाख ५८ हजार ७४९ ठेवीदारांचे ६११ कोटी रुपये अडकले. गेल्या १५ वर्षांत ठेवीदारांनी न्यायालय, शासन, रिझर्व्ह बँक आणि विविध यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केला. मात्र अद्यापही बहुतांश ठेवीदारांना त्यांची रक्कम मिळालेली नाही. शिक्षण, विवाह, वैद्यकीय उपचार आणि वृद्धापकाळासाठी ठेवलेले पैसे अडकल्याने अनेकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. बैठकीत संघर्ष समितीने न्यायालयीन प्रक्रियेची माहिती दिली. बँकेच्या मालमत्तेवरील अंमलबजावणी संचालनालय (ईडी)ची कारवाई मागे घेतल्याने ती मालमत्ता पेणच्या प्रांताधिकाऱ्यांच्या अखत्यारीत येण्याचा मार्ग मोकळा झाला असून मालमत्ता विक्रीद्वारे ठेवीदारांना पैसे परत देण्याची प्रक्रिया गती घेईल.अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. शासनाने या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करून रखडलेला न्याय द्यावा, प्रशासकीय मंडळाचे सदस्य पी. के. जगताप यांनी 'आतापर्यंत सुमारे ५७ कोटी रुपयांची वसुली झाली असून त्याचे नियोजनबद्ध वाटप करण्यासाठी योजना तयार केली जात आहे. तसेच ईडीची कारवाई मागे घेतल्यामुळे पुढील प्रक्रिया सुलभ होण्याची शक्यता असून ठेवीदारांना लवकरात लवकर दिलासा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## रेल्वेच्या जमिनीपासून ३० मीटरच्या आत बांधकामासाठी ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य

**रोहा : प्रतिनिधी**

रेल्वेच्या जमिनीच्या सीमेपासून ३० मीटरच्या आत कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाकडून 'ना-हरकत प्रमाणपत्र' घेणे अनिवार्य आहे. असे मध्य रेल्वेद्वारे जनतेला सूचित करण्यात आले आहे.

रेल्वे अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीदरम्यान असे निदर्शनास आले आहे की, प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या परिसरात, विशेषतः रेल्वेच्या जमिनीपासून ३० मीटरच्या आत, आवश्यक 'ना-हरकत प्रमाणपत्र' न घेता अनेक इमारती आणि इतर बांधकामे करण्यात आली आहेत.जमीन अधिग्रहण प्रक्रियेदरम्यान अशा बांधकामांमध्ये झालेली मोठी वाढ ही गंभीर चिंतेची बाब आहे. अनधिकृत बांधकामांमुळे रेल्वे प्रकल्पांच्या वेळेवर अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होऊ शकतो, जमीन अधिग्रहण प्रक्रियेत विलंब होऊ शकतो आणि नुकसान भरपाई व पात्रतेबाबत वाद निर्माण होऊ शकतात.

अचूक नोंदी ठेवण्यासाठी, रेल्वे प्रशासन प्रकल्प कॉरिडॉरचे ड्रोन आणि व्हिडिओ सर्वेक्षण करत आहे. या सर्वेक्षणांद्वारे अलीकडील बांधकामांपूर्वीची जमिनीची स्थिती अचूकपणे नोंदवली जात आहे.मध्य रेल्वेने जनतेसाठी सक्षम रेल्वे प्राधिकरणाकडून पूर्व-ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय रेल्वेच्या जमिनीपासून ३० मीटरच्या आत कोणतेही नवीन बांधकाम करू नका.नियमांचे उल्लंघन करून केलेले कोणतेही बांधकाम 'अनधिकृत' मानले जाईल आणि त्याबाबत लागू असलेल्या नियमांनुसार कारवाई केली जाईल.ना-हरकत प्रमाणपत्र शिवाय उभारलेल्या बांधकामांचा नुकसान भरपाईसाठी विचार केला जाणार नाही. अशा बांधकामावर झालेला कोणताही खर्च संबंधित व्यक्तीच्या स्वतःच्या जोखमीवर आणि खर्चावर असेल.अशा अनधिकृत बांधकामामुळे होणारे कोणतेही आर्थिक नुकसान, बांधकाम पाडण्याची कारवाई, नुकसान भरपाई न मिळणे किंवा इतर कोणत्याही परिणामांसाठी रेल्वे प्रशासन जबाबदार राहणार नाही.

या महत्त्वाची सूचना देण्यात आले आहेत.तर दुसरीकडे रेल्वेने सर्व ग्रामपंचायती, नगरपरिषदा, नियोजन प्राधिकरणे आणि इतर स्थानिक संस्थांनी रेल्वेची अनिवार्य ना-हरकत प्रमाणपत्र पडताळल्याशिवाय रेल्वेच्या जमिनीपासून ३० मीटरच्या आत इमारतींच्या बांधकामास परवानगी देऊ नये.

## माथेरान भाजप मित्र परिवाराकडून विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहर भाजप मित्र परिवाराकडून येथील तिन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.बेस्ट शिवहनुमान मंदिर ट्रस्ट सांताक्रूझ व माथेरान शहर भाजपा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शालेय वस्तूचे वाटप करण्यात आले.



यावेळी माथेरान नगरपालिका उपनगराध्यक्ष संतोष शेलार, शिक्षण समिती सभापती सुनील शिंदे, भाजप नगरसेवक तथा शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ, नगरसेविका प्रतिभा घावरे,भाजपा उपशहराध्यक्ष किरण चौधरी, सुभाष भोसले, माथेरान भाजप सरचिटणीस तथा माथेरान व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष राजेश चौधरी,माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव उपस्थित होते.

माथेरान मध्ये १४ जुलै रोजी नगरपालिका प्राथमिक शाळेत माथेरान नगरपालिका वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळा,प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्या मंदिर,सेंट झेव्हीअर्स हायस्कुल या तीन शाळातील एकूण ४७४ विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्या प्रमाणे २४२ डझन वह्यांचे वितरण करण्यात आले.माथेरानमध्ये अनेक विद्यार्थी यांचे पालक मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात तसेच काही विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा या हेतूने शालोपयोगी वस्तूचे वाटप करतो असे सांताक्रूझ येथील बेस्ट शिव हनुमान मंदिर ट्रस्टच्या ट्रस्टीनी यावेळी सांगितले.

या प्रसंगी नगरसेवक केतन रामाणे,सुरेखा साळुंखे,बाबू बर्गे,हॉटेल व्यवस्थापक शैलेश चाफेरकर जयश्री कदम,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे,शिक्षक वृंद तसेच विद्यार्थी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजू चव्हाण यांनी स्वीकारला कोकण विभागीय उपसंचालकपदाचा कार्यभार



**नवी मुंबई : नूतन उपसंचालक (माहिती) संजू चव्हाण यांनी कोकण विभागीय माहिती कार्यालयाचा कार्यभार स्वीकारला. त्यांचे ठाणे जिल्हा माहिती अधिकारी तथा मावळते प्रभारी उपसंचालक मनोज सानप यांनी स्वागत केले.**

**नवी मुंबई : बातमीदार**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागीय उपसंचालक (माहिती) या रिक्त पदावर सरळ सेवेने नवनियुक्त झालेले संजू उत्तम चव्हाण यांनी मंगळवारी (दि.१३) आपल्या पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला. सीबीडी बेलापूर येथील कोकण भवनमधील विभागीय माहिती कार्यालयातील उपसंचालकांच्या दालनात हा छोटेखानी पदभार ग्रहण कार्यक्रम झाला.

आतापर्यंत या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार ठाणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्याकडे होता. त्यांनी यशस्वीपणे ही जबाबदारी सांभाळत नवनियुक्त उपसंचालक श्री. चव्हाण यांच्याकडे या पदाची अधिकृत सूत्रे सुपूर्द केली आणि त्यांचे स्वागत केले. यावेळी विभागीय माहिती कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय कोकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, रायगड, पालघर आणि रत्नागिरी येथील जिल्हा माहिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डिजिटल माध्यमातून म्हणजेच दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग) या कार्यक्रमाला हजेरी लावली.

नवनियुक्त उपसंचालक चव्हाण यांना पत्रकारिता, माध्यम आणि जनसंपर्क क्षेत्रातील तब्बल १३ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी दै. सकाळ, पुण्यनगरी आणि नवभारत या वृत्तपत्रांमध्ये विविध पदांवर काम केले आहे. त्यांनी जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन (पत्रकारिता व जनसंवाद) या विषयात पदव्युत्तर पदवी संपादन केली असून सध्या ते जनसंपक या विषयात पीएचडी करत आहेत. नूतन उपसंचालक चव्हाण यांनी पदभार स्वीकारल्यानंतर उपस्थितांचे आभार मानले आणि कोकण विभागातील शासकीय योजनांचा प्रचार अन् प्रसार अधिक प्रभावीपणे करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. या पदभार हस्तांतरण कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि माध्यम प्रतिनिधींनी चव्हाण यांना त्यांच्या भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राजिपचा दिलासा ; भातबियाणे वाटपासाठी ५० लाखांची तरतूद

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांची व्यथा जाणून रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सभापती वैकुंठ पाटील यांच्या पुढाकाराने सेस फंडांतर्गत ७५ टक्के अनुदानावरील भातबियाणे योजनेसाठी ५० लाख रुपये अशी भरीव तरतूद शेतकऱ्यांना करण्यात आली आहे. जिल्हाभरातील एकूण १२ ते १५ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

यावर्षी रायगड जिल्ह्यामध्ये एकूण ६४०० हेक्टर क्षेत्रावर रोपवाटिका करण्यात आली होती. या सहा हजार चारशे हेक्टर रोपवाटिकेपासून जवळजवळ ६४ हजार हेक्टर क्षेत्र हे लागवडीखाली येणार होते, परंतु गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे यातील १९०० हेक्टर क्षेत्रावर पाणी भरलेले आहे. त्यामुळे भातपिकाचे मोठे नुकसान झालेले आहे. यामुळे या सर्व शेतक-यांवर दुबार पेरणीचे संकट आलेले आहे.

विशेषतः अलिबाग, पेण, पाली, रोहा या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी तसेच कमी दरात बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत संपूर्ण जिल्ह्यामध्ये तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सेस फंडांतर्गत ७५ टक्के अनुदानावर भात बियाणे वाटपासाठी ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. या आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा परिषद कृषी विभागाकडे भात बियाणे वाटपासाठी १० लाख रुपये उपलब्ध होते, परंतु ही आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सभापती वैकुंठ पाटील यांच्या पुढाकारातून ५० लाख रुपये अशी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेच्या माध्यमातून कमी कालावधीमध्ये येणारे व्हरायटी एमटीयू ११५३ या बियाण्याचे वाटप करण्यात येणार आहे. ही व्हरायटी ११० ते ११५ दिवसांमध्ये काढणीला येते. हे बियाणे महाबीज या शासकीय कंपनीमार्फत खरेदी करून शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणार आहे. १० किलोची बॅग १३५ रुपयांमध्ये शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचा ७/१२ व आधारकार्ड सादर करावयाचे आहे. त्याचप्रमाणे आपल्या तालुक्यातील पंचायत समिती कृषी विभागाकडे अधिक माहितीसाठी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

> **शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देउन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रथमच ७५ टक्के अनुदानावर भात बियाणे वाटपासाठी ५० लाखांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या योजनेचा नक्की लाभ घ्यावा.**
>
> **-वैकुंठ पाटील, कृषी, सभापती**

पान १ वरुन

### माथेरानच्या जंगल भागात बिबट्याचा वाढता वावर

दरम्यान, हनीमून पॉइंट परिसरातील ताज्या घटनेच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये बिबट्या अचानक अंधारातून येऊन श्वानावर झडप घालत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. ही घटना समोर आल्यानंतर येथे स्थानिक नागरिक, व्यापारी आणि पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माथेरान हे घनदाट जंगल आणि वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास असलेले पर्यटनस्थळ असल्याने येथे अधूनमधून बिबट्याचे दर्शन होत असते, मात्र पर्यटनस्थळाजवळ अशा प्रकारे श्वानावर हल्ला झाल्याने वन्यजीव आणि मानवी वस्ती यांच्यातील वाढता संपर्क पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे.

माथेरानमधील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वन विभागाने हनीमून पॉइंट, सनसेट पॉइंट आणि घाटरस्ता परिसरात नियमित गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, तर दुसरीकडे वन विभागाने नागरिक व पर्यटकांना विशेषतः रात्रीच्या वेळी एकटे फिरणे टाळावे, जंगलाच्या दिशेने जाऊ नये तसेच वन्यप्राणी आढळल्यास तत्काळ आम्हाला माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे.

### यशाने हुरळून आणि अपयशाने खचून जाऊ नका -सुभाष बोरसे

माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, निवृत्त मुख्याध्यापक कैलास सत्रे, संस्थेचे स्टेट बोर्ड स्कूल्स इन्स्पेक्टर संतोष चव्हाण, माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर, अजित सोनवणे, स्वाती पाटील, नीरजा अधुरी, वैशाली पारधी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पावसाळी आपत्ती व नियोजनासंदर्भात आज खालापूर येथे बैठक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर व कर्जत तालुक्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या आपत्तीची परिस्थिती, नुकसान व उपाययोजनांबाबत बुधवार दिनांक १५ जुलै रोजी खालापूर येथे नवीन प्रशासकीय इमारतीत मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी बैठक आयोजित केली आहे.

मावळ लोकसभा मतदार संघातील कर्जत व खालापूर तालुक्यात अलीकडील अतिवृष्टीमुळे पूरस्थिती, दरड कोसळणे, रस्ते, पूल, शेती, घरे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक गावांतील जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या नुकसानीचा आढावा घेणे, विविध विभागांनी केलेल्या उपाययोजनांची माहिती घेणे तसेच पुढील आवश्यक कार्यवाही निश्चित करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्या सर्व अनुषंगाने बुधबार, दिनांक १५ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता, खालापूर येथील नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये कर्जत व खालापूर पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सदर बैठकीस महसूल, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, आरोग्य, वीज वितरण,ग्रामीण पाणीपुरवठा, कृषी, आपत्ती व्यवस्थापन तसेच संबंधित सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित राहून आपल्या विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा सादर करणार आहेत.तसेच बाधित नागरिकांना तातडीने मदत, पंचनामे, नुकसानभरपाई व भविष्यात अशा आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

## उरण वाहतूक शाखेतर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील भागुबाई चांगू ठाकूर इंग्रजी माध्यम हायस्कूल, द्रोणागिरी येथे शाळा दत्तक योजनेंतर्गत वाहतूक सुरक्षेबाबत प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. उरण वाहतूक शाखेच्या वतीने इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियमांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गणेश पाटील, पोलीस हवालदार प्रमोद पाटील, पोलीस शिपाई करवंदे यांच्यासह वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# पूरग्रस्त आपटा कोळीवाड्याची पाहणी

## पनवेल पंचायत समितीकडून आरोग्य सेवेचाही आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आपटा कोळीवाडा येथे नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीला पूर आला होता. त्यामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आरोग्य सेवेचाही आढावा घेण्यात आला.



पंचायत समिती सभापती रंजना सदाशिव वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, पंचायत समिती सदस्य मयूर शेलार आणि माजी सरपंच सदाशिव वास्कर यांनी पूरग्रस्त घरांची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात ग्रामपंचायत अधिकारी कैलास मोरे, ग्रामपंचायत सदस्य मारुती चव्हाण, असद पिटू, राजू देशमुख, ज्ञानेश्वर भोईर हेही उपस्थित होते. यावेळी आपटा कोळीवाड्यातील नागरिकांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेण्यात आली.

आवश्यक मदत तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या. मुसळधार पावसादरम्यान पाताळगंगा नदीच्या पाण्यात वाहून जाऊन कुमार प्रदीप प्रज्वल कांबळे (१५) याचे दुर्दैवी निधन झाले होते. या पार्श्वभूमीवर कांबळे कुटुंबीयांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. पावसाळ्याच्या काळात नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळावी, औषधसाठा उपलब्ध ठेवावा तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्ज राहावे, अशा सूचना आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. पूरग्रस्त नागरिकांना मदत, आरोग्य सेवा व प्रशासनाचा तत्पर प्रतिसाद मिळावा यासाठी पनवेल पंचायत समिती व प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# खारघर मेट्रो परिसरात पाळीव कुत्र्यांमुळे प्रवासी हैराण

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील केंद्रीय विहार मेट्रो स्टेशन परिसरात भटकी जनावरे आणि पाळीव कुत्र्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. या स्थानकातून ये-जा करणारे नागरिक आणि प्रवासी त्रस्त झाले आहेत. मेट्रो परिसरात फिरणाऱ्या भटक्या जनावरांचा बंदोबस्त करण्यासह पाळीव कुत्र्यांना फिरण्यासाठी आणणाऱ्या नागरिकांवर नियमांचे पालन करावे, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

केंद्रीय विहार मेट्रो स्टेशन परिसरात दररोज अनेक नागरिक पाळीव कुत्र्यांना फिरवण्यासाठी येतात. याच भागात भटक्या गायींची संख्याही मोठी आहे. या गायी रस्ते, पदपथ आणि मोकळ्या जागांवर मलविसर्जन करत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्याचा फटका पादचारी, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना बसत आहे. केंद्रीय विहार मेट्रो स्थानकातून दररोज हजारो प्रवाशांची ये-जा होते, मात्र परिसरातील स्वच्छतेच्या अभावामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. पावसाळ्यात भटक्या गायी आणि पाळीव कुत्र्यांच्या मलमूत्रामुळे स्थानक परिसरात चिखल होत आहे. त्यामुळे प्रवासी घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच अस्वच्छतेमुळे आरोग्याच्या समस्याही उद्‌भवू शकतात, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

याबाबत स्थानिक रहिवासी रवींद्र सूर्यवंशी यांनी सांगितले की, पाळीव प्राण्यांना फिरवण्यासाठी आणणाऱ्या मालकांनी आपल्या कुत्र्यांचा मल तातडीने उचलून परिसर स्वच्छ ठेवावा. तसेच भटक्या जनावरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात. नियमित स्वच्छता, भटक्या जनावरांचे योग्य व्यवस्थापन आणि नियमांचे काटेकोर पालन झाल्यास मेट्रो परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि नागरिकांसाठी सुखकर होईल, अशी अपेक्षा स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

# मुर्बीतील तुटलेल्या झाडाची छाटणी; नागरिकांना दिलासा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका आणि अग्निशमन दल पथकाने खारघर सेक्टर-१९ मधील मुर्बी गावाच्या कमानीजवळ तुटलेल्या झाडाची सुरक्षित पद्‌धतीने छाटणी केली. रस्त्यावर पडलेल्या फांद्या हटवून वाहतुकीस अडथळा ठरणारा भाग मोकळा केल्याने मुर्बी गावात ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरातील वाहतूकही सुरळीत झाली आहे.

खारघर सेक्टर-१९ मधील मुर्बी गावाच्या कमानीजवळ तुटलेल्या झाडामुळे गावात ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. झाडाच्या फांद्या रस्त्यावर लोंबकळत असल्याने वाहनचालक, पादचारी तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अपघाताची भीती व्यक्त केली जात होती. या समस्येची दखल घेत संबंधित ग्रामस्थांनी पनवेल महापालिका तसेच अग्निशमन दल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर महापालिका आणि अग्निशमन दल पथकाने घटनास्थळी भेट देत तुटलेल्या झाडाची सुरक्षित पद्‌धतीने छाटणी केली. रस्त्यावरील फांद्या हटवून वाहतुकीसाठीचा मार्ग पूर्णपणे मोकळा करण्यात आला.

तातडीच्या कारवाईमुळे मुर्बी गावात येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळाला. मुर्बीतील रहिवासी तथा भाजप खारघर कामगार आघाडी अध्यक्ष मनेश पाटील यांनी मुलांना झाडांचे महत्त्व समजावे यासाठी मुलांना घेऊन मैदानात रोप लागवड केली.

# तोतया क्राईम ब्रँच अधिकारी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

खाकी वर्दीचा रुबाब दाखवून पनवेलमधील व्यक्तीची फसवणूक करणाऱ्या हायप्रोफाईल तोतया पोलीस अधिकाऱ्याला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. प्रणव उर्फ संतोष बाळुंजे (४४) असे या तोतया पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. त्याने स्वतःला नवी मुंबई क्राईम ब्रँचचा मोठा अधिकारी असल्याचे भासवून तक्रारदार आणि त्यांच्या ओळखीच्या लोकांकडून तब्बल चार लाख ७५ हजार रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे.




पोलिसांनी या तोतया पोलीस अधिकाऱ्याच्या दोन साथीदारांचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणातील तक्रारदार सत्यवान वसंत घरत (५२) हे करंजाडे येथे राहणारे असून त्यांचा रिअल इस्टेटचा व्यवसाय आहे. घरत यांचे व्यवसायातील अनेकांकडे १५ ते १६ लाख रुपये अडकले होते. हीच संधी साधून घरत यांचा मित्र संदीप घनगावे याने त्यांना पैसे वसूल करून देणारे क्राईम ब्रँचचे मोठे अधिकारी ओळखीचे असल्याचे सांगितले. काही महिन्यांपूर्वी आरोपी संतोष बाळुंजे पूर्ण पोलीस गणवेशात, खांद्यावर तीन स्टार लावून आणि बनावट पोलीस ओळखपत्र घेऊन महादेव कोंडीलकर आणि नथुराम पवार यांच्यासोबत घरत यांच्या घरी गेला होता.

अडचणीत असलेल्या लोकांकडून पैसे वसूल करून देण्याचे काम ते करतात आणि त्याबदल्यात रोख स्वरूपात कमिशन घेतात, असेही सांगितले. घरत यांचे अडकलेले पैसे वसूल करून देण्याच्या बदल्यात दोन लाख रुपये कमिशनची मागणी केली. घरत यांनी ज्या लोकांकडे पैसे अडकले होते त्यांची नावे, नंबर तसेच दोन लाख रुपये कमिशन तिघा भामट्यांना दिले. पैसे घेतल्यानंतरही कोणतेही काम न करता आरोपी संतोष बाळुंजे आणि त्याच्या साथीदारांनी घरत यांच्या ओळखीतील सतीश साबळे आणि विपुल केसवाल यांना पोलीस असल्याची धमकी देऊन कायदेशीर कारवाईची भीती दाखवली.

घरत यांच्या नावाने त्यांच्याकडून दोन लाख ७५ हजार रुपये उकळले. हा प्रकार समजल्यानंतर घरत यांनी पैसे मागितले असता आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे आणि पोलीस नावाने दमदाटी सुरू केली. अखेर घरत यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी तिघांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी संतोष बाळुंजेला तळोजा येथून अटक केली आहे. आरोपी महादेव कोंडीलकर आणि नथुराम पवार यांचा पोलीस शोध घेत आहेत.

# पनवेलमध्ये आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मयताची ओळख अद्याप पटलेली नसून त्याच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

पोलीस उपनिरीक्षक विष्णू ठोंगे यांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्रमांक ४३/२०२६ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये नोंद करण्यात आली आहे. २ जुलै रोजी सकाळी सुमारे ११.१० वाजण्याच्या सुमारास रिसॉर्टच्या मागील डोंगराळ झाडीत हा मृतदेह आढळला. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या वर्णनानुसार मृत व्यक्ती अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील पुरुष आहे. त्याचे केस काळे आहेत. चेहरा पूर्णपणे विद्रूप झालेला असून छाती व चेहऱ्यावर किडे लागलेले आहेत. अंगावर राखाडी रंगाची हाफ पॅन्ट असल्याचे दिसून आले आहे. या अज्ञात मृत व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा त्याची ओळख पटत असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवाजीनगर वसाहतीत गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या, छत्रीवाटप

**पनवेल : वार्ताहर**

आगामी शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिवसेनेच्या वतीने शिवाजीनगर वसाहत, प्रभाग क्रमांक १७ व २० येथे मोफत वह्या व छत्रीवाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.



या उपक्रमात शेकडो विद्यार्थ्यांना वह्या व छत्र्यांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा सल्लागार तथा माजी नगरसेवक रमेश गुडेकर आणि शिवसेना पनवेल उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना दिलासा मिळाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

यावेळी पनवेल महानगरप्रमुख तथा नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि मेहनतीच्या बळावर यश संपादन करण्याचे आवाहन केले. समाजातील वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले. पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिवसेना समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबवत असल्याचे सांगितले. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील उपक्रमांना प्राधान्य दिले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शिवसेना पनवेल शहर प्रसिद्धीप्रमुख तोफिक बागवान आणि शिवसेना उपविभागप्रमुख गुलाब बागवान यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील नेहा राठोड (टीवाय बीकॉम) हिने उत्कृष्ट कामगिरी करत वेटलिफ्टिंगच्या वेस्टन झोन टूर्नामेंटमध्ये सुवर्णपदक पटकावले आहे. या दमदार कामगिरीच्या जोरावर तिची आगामी व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहाचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे संचालक संजय भगत, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे, फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत आदी उपस्थित होते.**

# मित्राच्या स्मृतीला उजाळा; गोवठणेत कै. अनिल म्हात्रे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

१२ जुलै हा कै. अनिल शरद म्हात्रे या युवकाचा वाढदिवस. त्यांच्या मृत्यूनंतरही हा दिवस स्मरणात राहावा म्हणून त्यांच्या सर्व मित्रांनी सामाजिक उपक्रमाद्वारे तो साजरा करण्याचे ठरविले आणि ती कृती अमलातही आणली.

गेल्या वर्षी अनिल शरद म्हात्रे यांचा अवघ्या ३२ व्या वर्षी अल्पशा आजाराने मृत्यू झाला. त्यांच्या जाण्याने परिवारासह सर्व मित्रांना मोठा धक्का बसला. या दुःखातून अद्यापही परिवार आणि मित्रमंडळी सावरलेले नाहीत. कारण अनिल हा दोस्तीच्या दुनियेतील अवलिया होता. त्यांच्या मित्रांना सारखे वाटत राहते की अनिल अजूनही आपल्यातच आहे.

याच आठवणींतून ते बाहेर पडू शकत नाहीत. म्हणूनच या सर्व तरुणांनी यावर्षी १२ जुलै रोजी विविध उपक्रम राबवून त्यांचा वाढदिवस साजरा केला. यामध्ये प्रामुख्याने गावातील मराठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तरे, वह्या आणि पुस्तके वाटप करण्यात आली तसेच अनिल म्हात्रे यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी वृक्षारोपणाचा विशेष कार्यक्रम राबवून विविध प्रकारची झाडे लावण्यात आली.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थान ग्रुप गोवठणे, हॅकर बॉईज, कॉलेज गँग आणि दर्दी आशिक ग्रुप या सर्व संस्थांनी परिश्रम घेतले. मित्राच्या आठवणीला उजाळा देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा उपक्रम गावकऱ्यांच्या पसंतीस पडला.



**पनवेल : पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोन येथील विविध शैक्षणिक व विकासात्मक प्रश्नांवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन सकारात्मक आणि विधायक चर्चा करण्यात आली. यावेळी स्थानिक स्कूल समितीचे चेअरमन रमाकांत गावंड, अनंत गावंड, अनंत नारायण गावंड, स्थानिक सल्लागार समिती सदस्य व भाजपचे उपाध्यक्ष मुकुंद गावंड, विलास गावंड तसेच पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका निकिता गायकवाड उपस्थित होत्या. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही दिली.**

# लिंक पाठवून आर्थिक फसवणूक

**नवीन पनवेल :** महानगर गॅसच्या ऑफिसमधून बोलत असल्याचे सांगून लिंक पाठवून ती लिंक ओपन केली असता दोन लाख ३४ हजार रुपये इतर बँक खात्यात वळते करून घेण्यात आले. फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात १३ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रिन्स सिंग हे कळंबोली, रोडपाली येथे राहत असून २६ जूनला त्यांच्या मोबाइलवर महानगर गॅस ऑफिसमधून बोलत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी महानगर गॅसच्या कनेक्शनची जोडणी करण्यासाठी लिंक पाठवण्यात आली. त्या लिंकला ओपन होण्यासाठी लागणारे वेगवेगळ्या परमिशन त्यांच्याकडून घेऊन २ जुलै रोजी त्यांच्या बँक खात्यातून दोन लाख ३४ हजार रुपये इतर बँक खात्यात वळते करून घेऊन सिंग यांची फसवणूक करण्यात आली.

## संपादकीय

# आता हिंदुत्वाची आठवण!

रामाच्या नावावर जनभावना जागविण्याचा प्रयत्न करणाऱ्याचा राजकीय हेतू स्पष्ट दिसत असेल तर प्रश्न उपस्थित केले जाणे स्वाभाविकच आहे. उबाठा सेनेच्या रामरक्षा आंदोलनामागे श्रद्धेपेक्षा राजकारणच अधिक असल्याची टीका त्यामुळेच सातत्याने होते आहे.

**अयोध्येतील राम मंदिरामध्ये झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहाराचा मुद्दा चर्चेत ठेवण्यासाठी उबाठा सेना आता नागपूरमध्ये रामरक्षा आंदोलन करणार आहे. आपले राजकीय अस्तित्व टिकवण्याच्या धडपडीत हे सारे करताना, प्रभू श्रीराम हे देशातील कोट्यवधी नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र आहेत याचा विसर मात्र या पक्षाला पडलेला दिसतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना, रामरक्षा आंदोलनात सहभागी व्हायला आम्हीही तयार आहोत, पण उद्धव ठाकरे यांना रामरक्षा स्तोत्र येते का आणि त्याचा अर्थ माहिती आहे का असा उपरोधिक सवाल केला. उद्धव ठाकरे यांनी दोन पाने तरी रामरक्षा वाचून दाखवावी असे आव्हानच फडणवीस यांनी दिले आहे. उबाठा गटाला काही राजकीय अस्तित्वच उरलेले नाही. त्यामुळे सोनम वांगचुक असो किंवा इतर मुद्दे असोत उद्धव ठाकरे फक्त त्या नैराश्यातूनच बोलत असतात असेही फडणवीस यांनी म्हटले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही यासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. सरकारविरोधी आंदोलन करणाऱ्यांना उबाठाचा पाठिंबा असतो. जे आंदोलन सुरू आहे त्यात आपली पोळी कशी भाजता येईल एवढाच राजकीय हेतू त्यामागे असतो असे शिंदे यांनी म्हटले आहे. ज्यांनी हिंदुत्वाच्या भूमिकेपासून दूर जात वेगळ्या राजकीय आघाड्या स्वीकारल्या, त्यांच्याकडून आता रामरक्षेचा मुद्दा पुढे केला जात असल्याने त्यांच्या हेतूच्या प्रामाणिकपणाबद्दल प्रश्न विचारले जात आहेत. ठाकरे यांचे हिंदुत्व हे राजकीय सोयीसाठी स्वीकारलेले असल्याचा आरोप करत शिंदे यांनी, राम मंदिर उभारणीचे ऐतिहासिक वचन पूर्ण करणारे सरकार म्हणजे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार असल्याचे अधोरेखित केले. ते खरेच आहे. राम मंदिराचा प्रश्न हा दशकानुदशके न्यायालयीन, सामाजिक आणि राजकीय संघर्षाचा विषय होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मंदिर उभारणीचे काम वेगाने पूर्ण झाले आणि आज भव्य राम मंदिर देशाच्या अभिमानाचे प्रतीक बनले आहे. त्यामुळे मंदिराच्या नावावर आंदोलन करण्याऐवजी, संबंधित आरोपांची चौकशी कायदेशीर प्रक्रियेनुसार होऊ द्यावी अशी भारतीय जनता पक्षाची भूमिका आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत सत्तेत सहभागी होताना उद्धव ठाकरे यांचा हिंदुत्वाचा मूळ विचार मागे पडला आणि आता पुन्हा राम आणि हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करून ते पारंपरिक मतदारांशी भावनिक नाते जोडण्याचा प्रयत्न करत आहेत हे उघड आहे. भाजपविरोधासाठी हिंदुत्वावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या किंवा कोणत्याही विचारसरणीशी तडजोड करणाऱ्या घटकांसोबत राजकीय जवळीक ठेवत दुसरीकडे उबाठा आता रामरक्षेचे आंदोलन करत आहे हा विरोधाभास जनतेच्या सहज ध्यानात येतो आहे. अशा दुहेरी भूमिकेमुळे त्यांच्या आंदोलनाकडे कुठली नैतिक ताकद असणार? लोकशाहीत कोणत्याही मुद्यावर आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येक पक्षाला आहे. मात्र श्रद्धेच्या विषयांचा वापर केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांसाठी होऊ नये ही अपेक्षाही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळेच रामाच्या नावाचा वापर करताना सातत्य, विश्वासार्हता आणि कृती यांची कसोटीही तितकीच महत्त्वाची ठरते. रामरक्षेच्या नावाने सुरू झालेले हे आंदोलन जनतेला कितपत पटते हे येणाऱ्या काळात दिसेलच.**

# डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना





महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. शेतकरी हिताचे निर्णय व कल्याणकारी योजनांतून याची प्रचिती येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने नुकतेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर करून ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यासोबतच डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचाही लाभ शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. पीक कर्ज घेताना जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या माध्यमातून नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमधील दोन लाख ९७ हजार ३६६ शेतकरी सभासदांना ५२ कोटी ९६ लाख रुपयांच्या कर्जावरील व्याज माफ झाले आहे.

व्याजाची रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याने आता ही योजना नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. पीक कर्जाची वसुली मुदतपूर्वी होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदती पीककर्जाची संपूर्ण परतफेड प्रतीवर्षी ३० जून पूर्वी केल्यास शेतकऱ्यांना शासनाकडून व्याज सवलत अनुदान स्वरुपात देण्यात येत आहे. दि. ११ जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये तीन लाखापर्यंतच्या पीक कर्जासाठी तीन टक्के दराने व्याज सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. पीक कर्जाची परतफेड शेतक-यांनी विहित मुदतीत केल्यास त्यांना केंद्र शासनाच्या त्याचप्रमाणे प्रस्तुत योजनेचा लाभ मिळून रु. तीन लाखापर्यतचे पीक कर्ज बिनव्याजी उपलब्ध होत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेमुळे शेतकऱ्यांना बँक व्याज आकारते पण ते व्याज शासन भरते. शेतकऱ्यांनी फक्त मूळ रक्कम परत करायची आहे.

शेतकऱ्यांना शेती उत्पादनासाठी प्रोत्साहन देणाऱ्या या योजनेचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना मिळावा यासाठी राज्य शासनाने वर्षासाठी ४९८ कोटी ७५ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेअंतर्गत नागपूर विभागात मार्च अखेरपर्यंत दोन लक्ष ९७ हजार ३६६ लाभार्थी शेतकऱ्यांना ५२ कोटी ९६ लाख ६५ हजार रुपये वितरित करण्यात आले. ही रक्कम शासनाकडून लाभार्थी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा झालेली आहे. ही योजना म्हणजे शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यात न ठेवता त्यांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबनाकडे नेणारी महत्त्वाची योजना ठरली आहे.

नागपूर विभागात या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. विभागातील दोन कोटी ९७ लाख ३६६ लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये नागपूर जिल्ह्यातील सात हजार ३१९ शेतकऱ्यांना दोन कोटी ५१ लाख रुपयाची व्याज सवलत मिळाली आहे. भंडारा जिल्ह्यातील एक लाख १४ हजार ६२३ लाभार्थी शेतकऱ्यांना १५ कोटी ४६ लाख रुपयांची व्याज सवलत मिळाली. गोंदियातील ४० हजार ८२१ शेतकऱ्यांना पाच कोटी ३५ लाख रुपये, चंद्रपूर जिल्ह्यातील एक लाख १८ हजार ६२४ शेतकऱ्यांना २७ कोटी ७० लाख रुपयांची तर गडचिरोली जिल्ह्यातील एक हजार ५५८ शेतकऱ्यांना एक कोटी ९० लक्ष रुपये व्याज सवलत मिळाली आहे. विभागात ही योजना मागील चार वर्षापासून प्रभावीपणे राबविण्यात येत असल्यामुळेच दरवर्षी लाखो शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळत आहे.

यामध्ये २०२२- २३ मध्ये एक लाख४६ हजार ८६६ शेतकऱ्यांना १९ कोटी ८७ लक्ष रुपये, सन २३ -२४ मध्ये ९६ हजार ६८० लाभार्थी शेतकऱ्यांना १५ कोटी ४७ लाख रुपये तर २४ -२५ या आर्थिक वर्षात एक लाख २४ हजार ५९७ लाभार्थी शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात १८ कोटी ७९ लक्ष रुपये कर्जमाफी जमा करण्यात आली आहे.

व्याज सवलत योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी तीन लाखांपर्यंत शेती कर्ज घेतलेले असणे तसेच कर्ज नियमितपणे भरत असणे आवश्यक आहे. जे शेतकरी दोन्ही अटी पूर्ण करतात त्यांना कर्जावरील व्याज परत मिळणार आहे. ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. ही योजना कर्ज खात्याशी आधार लिंक असलेल्या लाभार्थ्यांना मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले बँक खाते आधारशी लिंक करणे आवश्यक आहे. शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेसाठी या योजनेचे लाभार्थी पात्र आहेत. कर्जदार शेतकऱ्यांना दोन्ही योजनांचा एकत्र लाभ मिळणार आहे.

**-अनिल गडेकर**

## विकसित गावांच्या नव्या युगाची सुरुवात

दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण भारताच्या रोजगार सुरक्षेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता नव्या स्वरूपात पुढे आली आहे. 'विकसित भारत जी-राम-जी' हा कायदा १ जुलै २०२६ पासून देशभर लागू झाला आहे. नुकताच २ जुलै रोजी या योजनेचा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते देशव्यापी शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा बदल केवळ १०० दिवसांच्या रोजगार हमीऐवजी १२५ दिवसांची हमी देणारा वाटू शकतो; परंतु प्रत्यक्षात या कायद्याचा गाभा रोजगारापेक्षा गावाच्या विकास नियोजनात आहे. ग्रामीण भारताच्या विकासाची दिशा, ग्रामपंचायतींची भूमिका आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची पद्धत बदलण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

या कायद्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे 'विकसित ग्रामपंचायत आराखडा'. आजपर्यंत अनेक गावांमध्ये विकासकामे उपलब्ध निधी किंवा विभागीय योजनांनुसार निश्चित केली जात होती. आता प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून पुढील काही वर्षांसाठी विकास आराखडा तयार करायचा आहे. गावात पाण्याची टंचाई कोठे आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कुठे शेततळी आवश्यक आहेत, कोणत्या वस्तीला रस्ता हवा, कुठे वृक्षलागवड करायची, पशुपालन, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, महिला बचत गट, युवकांचा कौशल्य विकास, तसेच हवामान बदलाशी सुसंगत कामे, या सर्व बाबींचा विचार एकाच आराखड्यात केला जाणार आहे. म्हणजेच आता ही केवळ 'काम शोधून देणारी योजना' न राहता 'विकास नियोजनावर आधारित रोजगार' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

'विकसित भारत' हे केवळ राष्ट्रीय घोषवाक्य नाही; त्याची सुरुवात प्रत्येक गावातून होणार आहे. रोजगार हमी ही या कायद्याची सुरुवात आहे; परंतु विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती हेच त्याचे अंतिम ध्येय आहे.


**-सचिन अडसूळ, जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**



## बदलते तंत्रज्ञान

## बायोमेट्रिक हजेरी : अंगठ्याचा ठसा सुरक्षित आहे का?

ऑफिस, सोसायटी, फोन अनलॉकसाठी फिंगरप्रिंट आणि फेस अनलॉक सर्रास वापरले जाते. आधारसाठी तर




डोळ्यांची बुबुळे म्हणजे आयरिस स्कॅन होते. सायबर कायदेतज्ज्ञ म्हणतात की, बायोमेट्रिक सोयीचे आहे कारण पासवर्ड विसरायची भीती नाही. चोरीला गेले तर? पासवर्ड बदलता येतो, पण बोट बदलता येत नाही.

२०१५ मध्ये अमेरिकेच्या OPM एजन्सीची माहिती हॅक झाली. ५६ लाख लोकांचे फिंगरप्रिंट चोरीला गेले. भारतात आधार माहिती सुरक्षित असल्याचा दावा UIDAI करते. माहिती 'टेम्प्लेट' स्वरूपात साठवली जाते. म्हणजे तुमच्या बोटाचे फोटो नाही, तर गणिती कोड साठवला जातो. त्यामुळे मूळ ठसा पुन्हा तयार करता येत नाही. स्वस्त फोनमध्ये फक्त 2D फोटो जुळवला जातो. तो तुमच्या फोटोनेच अनलॉक होऊ शकतो. ॲपलचा Face ID आणि महागड्या फोनमधील ३D डेप्थ सेन्सर सुरक्षित आहे. तो मास्कने फसत नाही. सॅमसंगच्या अल्ट्रासॉनिक सेन्सरला बोटाच्या कातडीखालच्या थराचे चित्र मिळते, त्यामुळे खोट्या ठशाने फसवणे कठीण आहे. भारताचा 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट २०२३' बायोमेट्रिकला 'संवेदनशील डेटा' मानतो. कंपनीने तुमची स्पष्ट संमती घेतल्याशिवाय तो घेता येत नाही. तो कशासाठी वापरला जाणार हे सांगणे बंधनकारक आहे.

**कशी काळजी घ्याल?**

१. कोणत्याही ॲपला बायोमेट्रिक परवानगी देताना विचार करा. २. फोन चोरीला गेल्यास लगेच 'Find My Device' वरून डेटा इरेज करा. ३. सार्वजनिक ठिकाणी फिंगरप्रिंट डिव्हाइसवर बोट ठेवण्यापूर्वी ते स्वच्छ आहे का पाहा. सिलिकॉनचा खोटा ठसा वापरून फसवणूक होऊ शकते. ४. आधार बायोमेट्रिक लॉक/अनलॉक करण्याची सुविधा mAadhaar ॲपवर वापरा. गरज नसेल तेव्हा लॉक ठेवा. ५. 'बायोमेट्रिक क्लोनिंग' टाळण्यासाठी एकच बोट सगळीकडे वापरू नका. ऑफिससाठी उजवा अंगठा, बँकेसाठी डावा अंगठा, फोनसाठी तर्जनी असे वापरा. बायोमेट्रिकमुळे ओळख पटवणे वेगवान झाले आहे, पण ते एकमेव सुरक्षाकवच मानू नका.

# विचारवंत, वक्ते प्रा. शिवाजीराव भोसले



### निमित्त

महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ विचारवंत, व्यासंगी लेखक व सुप्रसिद्ध वक्ते शिवाजीराव अनंतराव भोसले यांचा जन्म १५ जुलै १९२७ रोजी खटाव तालुक्यातील कलेढोण (सातारा जिल्हा) येथे अनसूयाबाई व अनंतराव या दांपत्यापोटी झाला. अनंतराव प्राथमिक शिक्षक होते, तर आई गृहिणी होत्या. वडिलांकडून त्यांना अमोघ वक्तृत्वाची देणगी मिळाली. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण कलेढोण व विटा येथे झाले.

माध्यमिक शिक्षण त्यांनी साताऱ्यात घेतले. बॅ. पी. जी. पाटील, शंकरराव खरात व डॉ. दत्ताजीराव साळुंखे हे तीन माजी विद्यापीठ कुलगुरू त्यांचे बोर्डिंगमधील सहाध्यायी होते. विद्यार्थिदशेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील, वेदमहर्षी सातवळेकर, श्री. म. माटे, प्रा. प्र. रा. दामले, प्राचार्य सोनोपंत दांडेकर प्रभृतींचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव पडला. त्यातून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

सुरुवातीस त्यांनी काही काळ साताऱ्यात वकिली केली. पुढे त्यांनी मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे १९५७ ते १९८८ पर्यंत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. याच महाविद्यालयात १९६३ ते १९८८ असे सलग २५ वर्षे ते प्राचार्य होते. निवृत्तीनंतर १९८८ ते १९९१ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे (औरंगाबाद) ते कुलगुरू होते. ते तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र हे विषय शिकवत. त्यांनी स्वामी विवेकानंद, श्री अरविंद, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा फुले, रवींद्रनाथ टागोर आदी थोर व्यक्तींच्या चरित्राचा अभ्यास केला, शिवाय महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, स्वामी चक्रधरांपासून ते संत गाडगेबाबांपर्यंतच्या संतांचाही त्यांचा व्यासंग होता. स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दीनिमित्त (१९६३) महाराष्ट्रभर त्यांनी व्याख्याने दिली. त्या वेळेपासून अखेरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र तसेच गोवा, इंदूर, हैदराबाद (दक्षिण), बंगळूरू इत्यादी ठिकाणी त्यांनी असंख्य व्याख्याने दिली. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत १९६९ ते १९९७ या काळात सतत अठ्ठावीस वर्षे व्याख्याने देण्याचा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. याशिवाय त्यांनी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील मराठी साहित्य संमेलन आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिका यांच्या द्वैवार्षिक स्नेहसंमेलनासाठी दोन वेळा अमेरिकेला भेटी दिल्या. त्या वेळी न्यू जर्सी, कॅलिफोर्निया, लॉस अँजेल्स, न्यूयॉर्क येथे त्यांनी व्याख्याने झाली. स्वामी समर्थांच्या पादुका नेणाऱ्या समितीसोबत ते १९९८ला सिंगापूरला गेले. त्या निमित्ताने त्यांनी रामदासांवर तिथेही व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानात थोर पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचा अंश असे, त्यांच्या विचाराचे विश्लेषण असे आणि त्यांच्या कार्याची-प्रबोधनाची मीमांसा असे. त्यांना अनेक मानसन्मान लाभले.

शिवाजीरावांच्या गंगौघासारख्या वक्तृत्वशैलीबद्दल डॉ. रघुनाथराव माशेलकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, सेतुमाधवराव पगडी, पु. ल. देशपांडे प्रभृती मान्यवरांनी गौरव उद्गार काढले आहेत. त्यांचे विचार माणसामध्ये उच्च दर्जाची प्रेरणा निर्माण करतात. त्यांची वक्तृत्वशैली गंगा प्रवाहासारखी प्रसन्न व पवित्र भावना जागृत करणारी आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सार्वत्रिक जीवनात स्वतःचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## वरण-भातावर 'हा' पदार्थ घालून खा

प्रत्येक घरात वरण बनवण्याची पद्धत वेगवेगळी असते. काही लोक सांबारमध्ये भरपूर भाज्या घालून डाळ शिजवतात तर काहीजण फक्त तूप आणि जीऱ्याची फोडणी देऊन डाळ शिजवतात. काहींना फोडणी देऊन वरण-भात खायला आवडतो. डाळ आपल्या आहाराचा एक महत्वपूर्ण भाग आहे. प्रथिने आपल्या शरीराचा आधारस्तंभ म्हणून ओळखली जातात आणि डाळ हे प्रथिनांचे सर्वात महत्वाचे स्रोत म्हणून



ओळखले जातात, विशेषतः शाकाहारी आहारासाठी. पण त्याच डाळी वारंवार खाल्ल्याने कंटाळवाण्या होऊ शकतात. मात्र तुम्ही तुमच्या डाळीत थोडे लिंबू पिळून ते बदलू शकता, ज्यामुळे डाळीला अधिक चव मिळेलच, शिवाय तुमच्या रोजच्या जेवणाचे पौष्टिक मूल्यही वाढेल. ते कसे पाहूया!

**व्हिटॅमिन सीचा स्रोत**

लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे तुमच्या रोगप्रतिकारक शक्तीला आधार देते आणि तुमची त्वचा निरोगी ठेवते. एका लिंबूमध्ये सुमारे ३१ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते, जे शिफारस केलेल्या दैनंदिन सेवनाच्या ५१% आहे, असे सल्लागार आहारतज्ज्ञ आणि मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा म्हणाल्या.

लिव्हर आणि किडनी कधीच खराब होणार नाही! कोलेस्ट्रॉलही होईल कमी; फक्त असे करा कोथिंबीरीचे सेवन, तज्ज्ञांनी दिली माहिती

डाळीमध्ये लिंबू घालल्याने पचनक्रिया चांगली होते, ज्यामध्ये भरपूर फायबर असते. कारण लिंबूमधील सायट्रिक आम्ल पोटातील आम्ल उत्पादन वाढवून पचनक्रिया वाढवते, ज्यामुळे अन्नाचे विघटन होण्यास मदत होते आणि पोषक तत्वांचे शोषण सोपे होते.

**अँटिऑक्सिडंट गुणधर्म**

लिंबूमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि इतर अँटिऑक्सिडंट्स असतात जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताणाशी लढण्यास मदत करतात,. या अँटिऑक्सिडंट गुणधर्मामुळे दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते.

किडनीच्या आरोग्यास प्रोत्साहन देतेलिंबूमधील सायट्रिक आम्ल मूत्रातील सायट्रेटची पातळी वाढवून किडनी स्टोन रोखण्यास मदत करू शकते, स्टोन तयार होण्यास प्रतिबंध करू शकते. हे विशेषतः ज्यांना किडनी स्टोन होण्याची शक्यता असते त्यांच्यासाठी फायदेशीर आहे.

# रायगड जिल्हा परिषदेकडून शेतकऱ्यांना बियाणे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने कृषी सभापती वैकुंठ पाटील यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या बियाणे वाटप कार्यक्रमात कृषी योजनांचे आणि शेतकरी हिताच्या उपक्रमांचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी कौतुक कले.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी आपल्या मनोगतात वैकुंठ पाटील यांचे विशेष आभार मानत, "मी आणि वैकुंठ पाटील हातात हात घालून शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करत आहोत. आज जिल्हा परिषदेत सर्वाधिक प्रभावी काम जर कोणी करत असेल, तर ते कृषी सभापती वैकुंठ पाटील आहेत," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

वाकडीकर पुढे म्हणाले की, वैकुंठ पाटील यांच्या संकल्पनेतून बियाणे वाटपाचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला असून, शेती विकासासाठी तब्बल चार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आवश्यक ते सहकार्य मिळेल. "मी स्वतः शेतकऱ्याचा मुलगा असल्याने शेतकऱ्यांच्या वेदना आणि अडचणी मला चांगल्या प्रकारे माहिती आहेत असेही त्यांनी सांगितले.



या कार्यक्रमास आमदार रविशेठ पाटील, कृषी सभापती वैकुंठ पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील, सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर, जि. प. सदस्य प्रभाकर पाटील, जि. प. सभापती भस्मा, प.स.सदस्य विवेक पाटील, प्रदीप म्हात्रे, मेघा पाटील कृषी अधिकारी सागर वाडकर मान्यवरांसह शेतकरी वर्ग उपस्थित होते.

यावेळी आमदार रवीशेठ पाटील यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यात पेण तालुका हा खऱ्या अर्थाने भाताचे कोठार आहे. मात्र यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे बळीराजासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अशा कठीण परिस्थितीत जिल्हा परिषदेने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहत बियाणे वाटपाचा उपक्रम राबविला आहे. या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले कि, हि जिल्हा परिषद ठेकेदारांची नसून शेतकऱ्यांची कष्टकरी जनतेची असून आज कार्यातून हे दाखवून दिले.

# रिलायन्स फाउंडेशनचा पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात

## नागोठणे परिसरातील नागरिकांना दिलासा

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नागोठणे व परिसरात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत रिलायन्स फाउंडेशनने जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने व्यापक मदत मोहीम राबवत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, नागोठणेचे अध्यक्ष शशांक गोयल तसेच जनसंपर्क व शासकीय समन्वय विभागाचे प्रमुख अनिल डांगी यांच्या मार्गदर्शनाखाली मदतकार्य तात्काळ सुरू करण्यात आले.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, नागोठणे-रोहा मार्ग, नागोठणे-पेझारी मार्ग तसेच नागोठणे आणि परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरील पूरग्रस्त नागरिकांना पिण्याचे पाणी, अन्नपाकिटे व अत्यावश्यक मदत साहित्याचे वितरण करण्यात आले. या मोहिमेद्वारे सुमारे आठ हजार पॅकेजबंद पाण्याच्या बाटल्या आणि मोठ्या प्रमाणात अन्नपाकिटे वितरित करण्यात आली.

मदतकार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी चार स्वतंत्र वाहनांची नियुक्ती करण्यात आली होती. १०० हून अधिक कर्मचारी, स्वयंसेवक, क्षेत्रीय कार्यकर्ते आणि विविध विभागांतील प्रतिनिधींनी आठवडाभर दिवस-रात्र कार्य करत मदतकार्य यशस्वी केले.

याशिवाय जिओच्या पथकाने दळणवळण सेवा सुरळीत ठेवण्यासाठी, तर रिलायन्स रिटेलच्या पथकाने जीवनावश्यक वस्तूंचा अखंड पुरवठा सुरू ठेवण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले. या संयुक्त प्रयत्नांमुळे १० हजारांहून अधिक पूरग्रस्त नागरिकांपर्यंत मदत पोहोचविण्यात यश आले.

जिल्हा प्रशासनाच्या मदत व पुनर्वसन कार्याला बळकटी देत रिलायन्स फाउंडेशनने संकटकाळात सामाजिक उत्तरदायित्वाचे प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले.



## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०६/२३७/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १४/०७/२०२६

### पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना

प्रति,
मा.सदस्य/सदस्या, ................................................
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,
पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र. ६, बुधवार दिनांक २२/०७/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०६, दिनांक २२/०७/२०२६ ची**
**विषयपत्रिका**

**१. मागील सर्वसाधारण सभा क्र. ५ दिनांक २३/०६/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.**
**२. प्रश्नोत्तरे**
**३. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**

१. दिनांक २०/०५/२०२६ रोजीचा स्थगित विषय - पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड, प्रभाग क्र. १९ मधील अं.भु.क्र.५०६ कोळीवाडा मार्केड यार्ड परिसरातील स्मशानभूमी विकसीत करणे. या कामाच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत..
२. **दिनांक २०/०५/२०२६ रोजीचा स्थगित विषय -** देहरंग धरणातून पनवेल शहराकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना करणेकामी प्रस्ताव जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र नागरी पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुर्नवापर योजनेअंतर्गत (MEWREP) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास सादर करणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान एलईडी पथदिवे देखभाल, दुरुस्ती तसेच नवीन एलईडी लाईट्स आणि CCMS चा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरुस्ती (१० वर्षे) साठी राज्यस्तरावर नेमलेल्या निविदाधारक राज्यस्तरावर M/s BAC Infratech Pvt. Ltd and M/s Vinic Global PVt.Ltd (JV) या संस्थेबरोबर करारनामा करणेकरिता मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.
४. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली व नवीन पनवेल येथील विविध ठिकाणच्या उद्यानांमध्ये डेकोरेटिव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर १२, भुखंड क्र. ५८B येथे उद्यान विकसित करणे.
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर २०, भुखंड क्र. १९ येथे उद्यान विकसित करणे.
७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर ०६ E, भुखंड क्र.०९ B येथे उद्यान विकसित करणे.
८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर - १२, अं.भु.क्र.१२ अ येथील मच्छी मार्केट (दैनिक बाजार) इमारतीचा परिसर विकसीत करणे, संरक्षण भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे.
९. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १८ पनवेल येथे स्वप्नरेखा सोसायटी ते ठाणा नाका जंक्शन येथे जुने पावसाळी गटार तोडुन नविन गटार बांधणे.
१०. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र - १४ मधील एच ओ सी कॉलनी लगत असलेल्या कातकरवाडी ते जिंदाल उपटाउन एव्हेन्यु इमारती पर्यंत आर.सी.सी पावसाळी गटाराचे बांधकाम करणे.
११. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - अ व इतर मध्ये रस्त्यालगत असणाऱ्या गटर, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकते नुसार सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन वर्षाकरीता झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
१२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमी मध्ये पाण्याची व्यवस्था करणे.
१३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात नवीन पाण्याचे पंप पुरवणे आणि बसविणे. (२ वर्षाकरिता)
१४. शिलार धरण प्रकल्पातंर्गत धरणाच्या भागभांडवली खर्चातील हिस्साची रक्कम जलसंपदा विभागास कामाच्या प्रगतीनुसार उपलब्ध करुन करणेबाबत.
१५. मेट्रो मार्ग-१२ (कल्याण-तळोजा (अमनदुत)) मार्गाचे अंमलबजावणीकरिता मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणास पनवेल महानगरपालिकेकडून आर्थिक सहाय्य मिळणेकामी विनंती.
१६. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे येथील ८५ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्रातील कार्यान्वित असलेल्या ब्लोअरऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ॲक्टिव्ह मॅग्नेटिव्ह बेअरिंग व इंटिग्रेटेड आयआयओटी सिस्टमसह असलेले ब्लोअर्स पीपीपी/रेस्को डीम्ड सेव्हिंग शेअरिंग तत्वावर बदलणे या कामाचा अहवाल, अंदाजपत्रक व निविदा सादर करणेकामी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) इत्यादी बाबी निश्चित करण्यासाठी MAHAPREIT या शासकीय संस्थेस मान्यता देणेबाबत.
१७. पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये अनावश्यक / धोकादायक वाढलेल्या वृक्षांच्य छाटणी केलेल्या फांद्या व पडलेले वृक्ष यांची विल्हेवाट लावणेकामी ट्रॅक्टर ट्रॉलीसह वूड चीपर मशीन प्रभाग निहायनुसार खरेदी करणे.
१८. पनवेल महानगरपालिकेचा सन २०२५ - २६ या कालावधीकरिता मुंबई विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ESR) मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत.
१९. पनवेल महानगरपालिका दिव्यांग कल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेच्या अर्थसहाय्यात वाढ करणेबाबत.
२०. श्री. नितिन देवराम साके यांचा माहिती व जनसंपर्क अधिकारी, गट ब पदाचा राजीनामा स्विकृत करणेबाबत.
२१. **"प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना"** या खाण बाधित क्षेत्रातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी संधी मिळणेकरिता घरघंटी / शिवणयंत्र / मिरची कांडप DBT तत्वावर पुरविणेबाबत.
२२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी "विरंगुळा केंद्र" स्थापन करुन धोरण ठरविणेबाबत.
२३. समाज विकास मार्फत पनवेल महानगरपालिका हद्दीतील युवक-युवतींना MSCIT (Maharashtra State Certificate in Information Technology) मोफत प्रशिक्षण देणेबाबत.
२४. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फरशीपाडा, आडिवली, रोहिंजण व पेणधर येथील शाळांकरीता तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबत.
२५. गणेशोत्सव व नवरात्रौत्सव २०२६ निमित्त पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध विसर्जन घाट येथे सुविधा पुरविणे, दुरुस्ती करणे व कृत्रिम तलाव बांधणेबाबत.
२६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अं. भु. क्र. १८४/१ ए पार्ट बहुमजली यांत्रिकी वाहनतळ उभारणे प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )**
महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १४/०७/२०२६.
सोबत - विषयांचे गोषवारे तसेच सर्वसाधारण सभा क्र.५, दिनांक २३/०६/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त.

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.२११/२२३/२०२६

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

## पनवेल महानगरपालिका

तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड - ४१०२०६
**अग्निशमन विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

याद्वारे सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागामार्फत नागरिकांच्या सोयीसाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन विभागाशी अधिक सुलभ व जलद संपर्क साधता यावा, या उद्देशाने सुरू असलेल्या दूरध्वनी क्रमांकांव्यतिरिक्त, नवीन दूरध्वनी क्रमांक कार्यान्वित करण्यात आले आहेत. नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. सदर दूरध्वनी क्र. www.panvelcorporation.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच panvel connect app वर दिनांक १५/७/२०२६ रोजी पासुन अद्ययावत करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | अग्निशमन केंद्र | कार्यरत दूरध्वनी क्र. | नविन दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | पनवेल | ०२२२७४६१५०० | ०२२६५७९८६०० |
| २. | नविन पनवेल | ०२२२७४५२३३७<br>०२२६९३६५६७० | ०२२६५००८७०० |
| ३. | कळंबोली | ०२२२७४२०१३७<br>०२२२७४२०१३८ | ०२२६५४३०८०० |
| ४. | कामोठे<br>उप अग्निशमन केंद्र | ८४५४९२४८४५<br>८४५४८१८९४५ | ०२२६५४३०७०० |

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.२०९/२२१/२०२६
दिनांक :- १४/०७/२०२६

**सही/-**
**(कैलास गावडे)**
उपआयुक्त (मुख्यालय-१) पनवेल महानगरपालिका

## जाहीर सूचना

मे. उन्मेश हाऊस मेकर्स तर्फे प्रो. श्री. एल. आर. वेंकटरामण, पत्ता. ५०१, भूमी लॅण्डमार्क, प्लॉट नं. ३४/३४ए, सेक्टर १७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सूचना देत आहेत.
आमच्या नावे, ताबे-कब्जातील मौजे ऊसर्ली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथे महसूल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमिन मिळकत आहे.

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र चै. मी. |
|---|---|---|
| १ | १६६/१ | ८२१३.०० |
| २ | १६६/२ | १२४६.०० |
| ३ | १६६/३ | ३०००.०० |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोसिएट्स प्लॅनर (नैना) सिडकोने आम्हास वर नमुद जमिन मिळकतीमध्ये इमारती बांधण्यास त्यांचे पत्र क्र. सिडको / नैना / पनवेल / ऊसली खुर्द / बीपी-००७३५/ सीसी / २०२५ / १४७१, दि. ०२/१२/२०२५ द्वारे परवानगी दिलेली आहे आणि सदर रक्कम नगररचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लॅनर (नैना) सिडको यांनी त्यांचे क्र. सिडको / नैना / पनवेल / उसली खुर्द /बीपी -००७३५ / सीसी / २०२५ / १४७१, दि. ०२/१२/२०२५ द्वारे कमेन्समेंट सर्टिफिकेट दिलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही आमच्या प्रकल्पासंबंधीत खालीलप्रमाणे माहीती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक / विकासाचा नाव व पत्ता | मे. उन्मेश हाऊस मेकर्स तर्फे प्रो. श्री. एल. आर. वेंकटरामण पत्ताः ५०१, भूमी लॅण्डमार्क, प्लॉट नं. ३४/३४ए, सेक्टर १७, खांदाकॉलनी, नवीन पनवेल (प.), ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ |
| कंत्राटदाराचे नाव व पत्ता | जयराम कन्स्ट्रकशन<br>पत्ता : १००२, न्यू गुलमोहर सीएचएस, सुंदरवन पार्क, समता नगर, ठाणे (प), ठाणे - ४००६०४. |
| विकासकाची परवानगी मंजुरी झाल्याचे आदेश क्र. आणिण दिनांक | पत्र क्र. सिडको / नैना/पनवेल/ऊसलीखुर्द / बीपी - ००७३५/सीसी/२०२५/१४७१, दि. ०२/१२/२०२५ |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजूर क्षेत्र | बिल्डिंग नं. १ मध्ये २८ सदनिका व ६ दुकाने, बिल्डिंग नं. २ मध्ये ४ सदनिका बांधण्याची परवानगी मिळालेली आहे. ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र १७०९.६६ चौ.मीटर आहे. |
| मंजूर नकाशे व इतर कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | मे. उन्मेश हाऊस मेकर्स तर्फे प्रो. श्री. एल. आर. वेंकटरामण पत्ताः ५०१, भूमी लॅण्डमार्क, प्लॉट नं. ३४/३४ए, सेक्टर १७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ |
| आर्किटेक्चरचे नाव | श्री. दिपक पांडुरग ठाकरे<br>पत्ता, ५०९, विंग अ, श्री. नंदधाम, सेक्टर १९, सी.बी. डी- बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४. |
| स्ट्रक्चरल इंजिनियरचे नाव | असोसिएटेड स्ट्रक्चरल इंजिनिअर एल.एल.पी<br>पत्ताः ६०७, ओपल स्क्वेअर, रैलादेवी तलावासमोर, एस. जी. बर्वे रोड, वागले इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४. |

ठिकाण : पनवेल
दिनांक : १४/०७/२०२६

**सही/-**
**उन्मेश हाऊस मेकर्स तर्फे**
प्रो. श्री. एल. आर. वेंकटरामण
मो.नं. ९८३३३५५५१५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे विहीघर,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **श्री. विष्णू भागा पाटील व इतर** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे विहीघर,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | रू.पै. |
| ५८ | ०-२३-०० | ०-००-०० | ०-२३-०० | २.१२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १४/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्कः- ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत श्री. कृष्णा धर्मा ठोंबरे व यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वडवली, तालुका- पनवेल, जिल्हा - रायगड**

| भोगवटाधारक | गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे. आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. कृष्णा धर्मा ठोंबरे | ४४ | ५ | ०-५४-१०<br>पो.ख.०-००-००<br>**एकूण ०-५४-१०**<br>पैकी भोगवटाधार यांच्या मालकीहक्काचे ०-१४-०० इतके क्षेत्र विक्रीस | ११.९६ |
| श्री. भगवान धर्मा ठोंबरे | | | ०-०७-१०<br>पो.ख.०-०८-९०<br>**एकूण ०-१६-००**<br>पैकी भोगवटाधार यांच्या मालकीहक्काचे ०-१६-०० इतके क्षेत्र विक्रीस | १.७६ |
| | | **एकूण विक्री क्षेत्र** | **०-३०-००** | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०७/२०२६

**सही / -**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले**
२०३, मोहिनील अपार्टमेंट,नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड - ४००७०२. मोबाईल नं. ७४०००९७२८६

# पावसाची उघडीप; नवी मुंबईत कामे युद्धपातळीवर करण्याचे निर्देश



**नवी मुंबई : बातमीदार**

१ ते ८ जुलैदरम्यान नवी मुंबईत संततधार पाऊस झाल्यानंतर आता हवामानात काहीशी उघडीप मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते, पाणी निचरा, स्वच्छता आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत. अभियांत्रिकी विभागाच्या विशेष बैठकीत बोलताना आयुक्तांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यासह स्थापत्य, पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, विद्युत, यांत्रिकी आणि पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. पावसामुळे रस्त्यांवर पडलेले खड्डे युद्धपातळीवर दुरुस्त करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. यासाठी पेव्हर ब्लॉकऐवजी अस्फाल्ट आणि काँक्रिटीकरण साहित्य वापरण्याची सूचना करण्यात आली. रस्त्यांवर पाणी साचू नये यासाठी पाणी साचणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून त्याची कारणे शोधून तातडीने उपाययोजना कराव्यात. रस्त्याच्या कडेला असलेले ड्रेन होल रस्त्याच्या पातळीपेक्षा उंच असल्यास ते रस्त्याच्या पातळीला आणावेत. अतिसखल भागांमध्ये अतिरिक्त पाणी उपसा पंपांची व्यवस्था करावी. उपसले पाणी कोणत्या नाल्यात सोडल्याने सहज वाहून जाईल याचीही पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

इतर शहरांमध्ये उघड्या मॅनहोलमुळे झालेल्या दुर्घटना लक्षात घेऊन नवी मुंबईतील सर्व मॅनहोलवर भक्कम झाकणे आहेत का याची बारकाईने पाहणी करावी. एकही मॅनहोल झाकणाविना राहणार नाही याची काटेकोर काळजी घ्यावी. यात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच मॅनहोलच्या झाकणांखाली संरक्षक तारांची जाळी लावण्याबाबत चाचणी करून त्यानुसार कार्यवाही करण्यास सांगितले. महामार्ग आणि मुख्य रस्त्यांवर पावसामुळे साचलेली माती, रेती आणि डेब्रिज तातडीने उचलून स्वच्छता मोहीम राबवावी. त्यामुळे पाण्याचा निचरा सुरळीत होण्यास मदत होईल. एमएसईडीसीएलच्या अनेक विद्युत वाहिन्या गटारातून जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या सुरक्षितपणे हलविण्यासाठी संबंधित विभागाला लेखी कळवावे. विद्युत वाहिन्यांमुळे कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी संपूर्ण क्षेत्राची पाहणी करण्याचे निर्देश विद्युत विभागाला देण्यात आले.

सर्व कार्यकारी अभियंत्यांनी समन्वयाने काम करावे. पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करावे. सर्व विभागांत पाण्याचे समान वितरण आणि दर्जा चांगला राहील याची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात मलनिःस्सारण वाहिन्या ओव्हर फ्लो होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. मलप्रक्रिया केंद्रांच्या व्यवस्थापनावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. 'कॅच द रेन' अभियानांतर्गत नागरिकांना पाणी वाचविण्याचे महत्त्व पटवून द्यावे. सोसायट्या आणि वसाहतींमध्ये छतावरील पाणी साठवण प्रकल्प राबविण्यास प्रोत्साहन द्यावे. पावसाळ्यात साथरोग वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी घराजवळ पाणी साचू देऊ नये. आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळावा आणि पाण्याच्या टाक्या स्वच्छ कराव्यात, असे आवाहनही आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# खारघरमधील अतिक्रमणांवर पालिकेची तोडक कारवाई



अनधिकृत नर्सरी, हातगाड्या हटवल्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर प्रभागातील विविध ठिकाणी फुटपाथ आणि सार्वजनिक जागांवरील अनधिकृत अतिक्रमणांवर विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान अनधिकृत नर्सरी, हातगाड्या, टेम्पो, स्टॉल तसेच इतर विविध प्रकारचे अनधिकृत व्यवसाय जेसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आले.



पादचाऱ्यांसाठी फुटपाथ मोकळे करणे, वाहतूक सुरळीत ठेवणे व सार्वजनिक जागांचा नागरिकांना सुरक्षित वापर करता यावा या उद्देशाने कारवाई करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने व प्रभारी अधीक्षक जितू मढवी उपस्थित होते. महापालिकेने नियमांचे पालन करून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी केले आहे.

# 'जेबीएसपीएस'चा नवा विक्रम

## सलग पाचव्यांदा एमएसबीटीईचा उत्कृष्ट दर्जा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जेबीएसपीएस इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टीने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून (एमएसबीटीई) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी संस्थेला प्रतिष्ठेचा "उत्कृष्ट" दर्जा प्रदान करण्यात आला आहे. संस्थेला हा सन्मान मिळण्याची ही पाचवी वेळ आहे.

एमएसबीटीईकडून संलग्न संस्थांचे शैक्षणिक, प्रशासकीय आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध निकषांवर मूल्यमापन केले जाते. यात अध्यापनाची गुणवत्ता, प्राध्यापकांची कामगिरी, शैक्षणिक नियोजन, विद्यार्थ्यांचे निकाल, प्रयोगशाळा व ग्रंथालय सुविधा, अभिलेख व्यवस्थापन, औद्योगिक समन्वय आणि संस्थेचे एकूण व्यवस्थापन यांचा समावेश असतो. जेबीएसपीएस इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टीला पाचव्यांदा "उत्कृष्ट" दर्जा मिळणे हे संस्थेने सातत्याने जपलेल्या गुणवत्तेचे, शिस्तीचे आणि शैक्षणिक बांधिलकीचे प्रतीक आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे हे यश संपादन झाले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे संस्थेच्या प्रगतीला मोलाची दिशा मिळाली आहे. संस्थेचे व्यवस्थापन, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे उल्लेखनीय यश शक्य झाले आहे. जेबीएसपीएस इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टी औद्योगिक सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण क्षेत्रात सक्षम व जबाबदार व्यावसायिक घडविण्यासाठी सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहे.



# पनवेल महापालिकेकडून अग्निशमन सेवेसाठी नवीन हेल्पलाइन क्रमांक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत अधिक तत्पर आणि प्रभावी सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने अतिरिक्त नवीन दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध केले आहेत. आग, पूर, झाड कोसळणे, इमारत दुर्घटना तसेच इतर आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी संबंधित अग्निशमन केंद्राशी तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी आणि संबंधित अग्निशमन केंद्राशी संपर्क साधून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.नागरिकांच्या सोयीसाठी पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली आणि कामोठे या चारही अग्निशमन केंद्रांचे जुन्या क्रमांकांसोबतच नवीन दूरध्वनी क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याबाबतची माहिती Panvel Connect ॲप आणि महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**नवीन आणि कार्यरत दूरध्वनी क्रमांक:** पनवेल अग्निशमन केंद्र कार्यरत: ०२-२७४६ १५० नवीन: ०२२-६५७९ ८६०, नवीन पनवेल अग्निशमन केंद्र कार्यरत: ०२२-२७४५ २३३७, ०२२-६९३६ ५६७० नवीन: ०२२-६५० ८७०, कळंबोली अग्निशमन केंद्र कार्यरत: ०२२-२७४२ ०१३८ नवीन: ०२-६५४३ ०८००, कामोठे उप अग्निशमन केंद्र कार्यरत: ८४५४ ९२४८४५, ८४५४ ८१८९४५ नवीन: ०२२-६५४३ ०७००.

# उरणमधील शाळेमध्ये दहावीतील टॉपर्सचा गुणगौरव

**उरण : वार्ताहर**

"विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनात एक निश्चित ध्येय ठेवले, तर यशाचे शिखर नक्कीच सर करता येते," असा विश्वास पाणदिवे येथील पुंडलिक रामा पाटील इंग्रजी शाळेचे चेअरमन प्रकाश पाटील यांनी व्यक्त केला. शाळेतील दहावीच्या परीक्षेत प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानच्या वतीने नुकताच उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते.

या गुणगौरव सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षक मनोज पाटील आणि महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष निलेश पाटील उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान मार्गदर्शन करताना आदर्श शिक्षक मनोज पाटील यांनी शिक्षण क्षेत्रातील आधुनिक बदलांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी भविष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटावर धैर्याने मात करून यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या परीक्षेत शाळेतून प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण होऊन यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये जुही दीपक पाटील प्रथम, कौस्तुभ उल्हास पाटील द्वितीय, प्रांजल अजय गावंड तृतीय, आचल राजेश पाटील चतुर्थ आणि साची संजय म्हात्रे पाचवा क्रमांक यांचा समावेश आहे.

## निवडक

### २१ हजार ५०० रुपयांचे मद्य जप्त

**नवीन पनवेल :** कामोठे पोलिसांनी मोठा खांदा गावात छापा टाकून २१ हजार ५०० रुपयांचे मद्य जप्त केले आहे. १३ जुलै रोजी मोरेश्वर मीनानाथ भगत (३८) याने तो राहत असलेल्या घरासमोरील गल्लीत २१ हजार ५०० रुपये किमतीचे मद्य बाळगल्याप्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हुंडाप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** महिलेकडून हुंडा मागून तिला शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पती, सासू, सासरे, नणंद यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात १३ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी यांनी समुपदेशनासाठी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता, मात्र समुपदेशन अयशस्वी झाल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल केला. फिर्यादीला हुंडा तसेच घरातील किरकोळ कारणावरून वाद घालून दमदाटी तसेच शिवीगाळ करून मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यात आला.

### नोकरीच्या बहाण्याने फसवणूक

**नवीन पनवेल :** फार्मासिस्ट म्हणून नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी रामेश्वर पवळ (राहणार कापीलानगर, अकोला) व कैलास मुंडे (राहणार देवगाव, केज, बीड) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १३ जुलैला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी कैलास मुंडेला अटक करण्यात आली आहे. फिर्यादी यांच्या पतीकडून महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात फार्मासिस्ट म्हणून नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून दोघांनी सहा लाख रुपये घेतले आणि त्यांना नोकरी लावून दिली नाही. फिर्यादींनी पैसे परत मागितले असता ते परत न करता फसवणूक केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी कैलास मुंडेला अटक केली. दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

### फणसवाडी, चाफेवाडी दरडग्रस्त

**पनवेल :** रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागातर्फे खारघर डोंगरावरील फणसवाडी आणि चाफेवाडी आदिवासी पाड्यांना दरडग्रस्त गाव म्हणून घोषित करण्यात आले आहे. खारघर परिसरातील दरडग्रस्त गाव घोषित करण्याच्या अनुषंगाने आपत्कालीन समिती स्थापन करण्यात आली आहे. दरडग्रस्त म्हणून घोषित झाल्यामुळे आता या पाड्यांतील नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि पुनर्वसनासाठी प्रशासनाकडून पुढील उपाययोजना करण्यात येणार आहेत.

# ऐरोलीत पतीची मर्डर मिस्ट्री ११ महिन्यांनंतर उघड; पत्नीसह प्रियकराला बेड्या

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ऐरोलीतील यादवनगर परिसरात गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये घडलेल्या एका थरारक हत्याकांडाचा तब्बल ११ महिन्यांनंतर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी उलगडा केला आहे. अनैतिक संबंधात पती अडथळा ठरत असल्याच्या कारणावरून पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीची निर्घृण हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपींनी मृतदेहाचे मुंडके, धड आणि पाय असे तीन तुकडे करून ते गवळी देव डोंगर परिसरातील घनदाट जंगलात वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

याप्रकरणी पोलिसांनी बलीराम सूर्यनाथ कुशवाह (५०) यांची पत्नी सुनीता कुशवाह (४०) आणि तिचा प्रियकर राहुल दशरथ प्रजापती (३०) यांना अटक केली आहे. न्यायालयाने दोघांनाही सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांच्या



कबुलीजबाबाच्या आधारे मृतदेहाचे अवशेष शोधण्यासाठी पोलिसांनी गवळी देव परिसरात शोधमोहीम सुरू केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बलीराम कुशवाह हे ऐरोलीतील यादवनगर येथे पत्नी आणि दोन मुलांसह राहत होते. याच काळात सुनीताचे घणसोली येथे राहणाऱ्या रिक्षाचालक राहुल प्रजापतीशी प्रेमसंबंध जुळले. या संबंधांना बलीराम यांनी विरोध केला. त्यामुळे पतीला मार्गातून दूर करण्याचा कट सुनीता आणि राहुल यांनी रचला. कटाची अंमलबजावणी करण्यासाठी सुनीताने आधी दोन्ही मुलांना दोन दिवसांसाठी त्यांच्या मावशीकडे पाठवले. ९ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री बलीराम गाढ झोपेत असताना दोघांनी त्यांचा गळा आवळला. त्यानंतर धारदार चाकूने गळ्यावर वार करून त्यांची हत्या केली. हत्येनंतर आरोपींनी घरातच मृतदेहाचे तीन तुकडे केले. हे तुकडे वेगवेगळ्या गोण्या आणि चादरीत गुंडाळून राहुलच्या रिक्षातून रात्रीच्या अंधारात गवळी देव परिसरातील जंगलात नेण्यात आले. तेथे तीन वेगवेगळ्या ठिकाणी मृतदेहाचे तुकडे फेकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. गुन्ह्यानंतर संशय येऊ नये म्हणून सुनीताने यादवनगरमधील घर भाड्याने दिले आणि मुलांसह राहुलसोबत घणसोली येथे राहण्यास सुरुवात केली. नातेवाइकांकडे बलीराम घर सोडून गेल्याचे सांगून ती वेळ मारून नेत होती. जवळपास आठ महिन्यांनंतर बलीराम यांचा भाऊ गावाहून आला. त्याने भावाबाबत चौकशी केली असता सुनीताने भांडण झाल्यानंतर बलीराम घर सोडून गेल्याचे सांगितले. संशय बळावल्याने एप्रिल २०२६ मध्ये रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बलीराम बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीनंतर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. सुनीता आणि राहुल यांनी जुने मोबाइल आणि सिमकार्ड बदलून नवे मोबाइल वापरण्यास सुरुवात केली होती, मात्र जुन्या कॉल डिटेल रेकॉर्डमध्ये राहुल वेगवेगळे क्रमांक वापरत असला तरी त्याचा सातत्याने सुनीताशीच संपर्क असल्याचे स्पष्ट झाले. चौकशीत सुनीता पतीबाबत प्रत्येक वेळी वेगवेगळी माहिती देत होती. अखेर दोघांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यांनी हत्येची कबुली दिली.

आरोपींच्या कबुलीजबाबानंतर पोलिसांनी गवळी देव डोंगर परिसरात मृतदेहाचे अवशेष शोधण्याची मोहीम सुरू केली, मात्र गुन्हा घडून बराच काळ लोटल्याने पावसाळा, वन्यप्राण्यांचा वावर व नैसर्गिक बदलांमुळे पुरावे नष्ट झाल्याची शक्यता आहे. त्यामुळे तपास पथकासमोर मोठे आव्हान आहे. पुढील तपास रबाळे एमआयडीसी पोलीस करीत आहेत. गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे, मृतदेहाची विल्हेवाट लावताना वापरलेले साहित्य आणि इतर पुरावे जप्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# ज्येष्ठांच्या हितासाठी आमदार मंदा म्हात्रे यांची बांधिलकी



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. फेस्कॉम मुंबई विभाग आणि विविध ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि. १३) त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या ११ महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन त्यांना सादर करण्यात आले.

फेस्कॉम मुंबई विभागाचे अध्यक्ष सुरेश पोटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विकास साठे आणि सचिव अजय माढेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आमदार मंदा म्हात्रे यांची भेट घेतली. यावेळी सुरेश पोटे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी सातत्याने केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांना सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ प्रदान केला. निवेदन स्वीकारताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे अनुभवसंपन्न मार्गदर्शक आणि आपल्या संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या समस्या सोडविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

फेस्कॉमने मांडलेल्या ११ मागण्या मुख्यमंत्री स्तरावर मांडून मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली. आमदारांच्या सकारात्मक भूमिकेमुळे उपस्थित ज्येष्ठ नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. त्यांच्या मागण्यांकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर ठोस कृतीच्या दृष्टीने पाहिले जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी फेस्कॉमचे पदाधिकारी, विविध ज्येष्ठ नागरिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# वरंध घाटात दरडींचे सत्र सुरूच

## भोर हद्दीत १५ ठिकाणी मातीचे ढिगारे

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड भोर मार्गावरील वरंधा घाटात दरडी कोसाळण्याचे सत्र काही केल्या थांबेना. शुक्रवार ५ जुलै आणि रविवार ७ जुलै रोजी पडलेल्या दरडींनंतर भोर हद्दीतील वारवंड ते उंबर्डे दरम्यानच्या रस्त्यावर ८ जुलैच्या रात्री चार ते पाच वेगवेगळ्या ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

रात्रीपासून वरंधा घाट वाहतुकीस पुन्हा पुर्णतः बंद करण्यात आला होता, मात्र गेल्या तीन दिवसा पासून पाऊस थांबला असला तरी या ३० किमीचा मार्गवर अनेक ठिकाणी मातीचा सडा रस्त्यावर आल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या मार्गवर प्रवास धोकादायक असला तरी अनेक लहान कार ,टेम्पो ट्रॅव्हलचा खुलेआम प्रवास सुरु असल्याचे वास्तववादी चित्र या मार्गवर पहावयास मिळते दरम्यान, दोन्ही बाजूचा रस्ता ५ ते ८ जुलै रोजी बंद झाल्याने प्रवास करणारी काही वाहने



व प्रवाशी अडकले आहेत. शासनाकडून दरडी हटवण्याचे काम तात्काळ करत वाहने मार्गस्त होतील अशी दरड बाजूला करण्यात आली रस्त्यावरील माती पूर्णपणे न काढल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी माती व चिखल दिसून येत आहे.

वारवंड ते उंबर्डे दरम्यान पडलेल्या दोन दरडी मधील अंतरात यामार्गावरुन प्रवास करणारी मोटारी व मालवाहतूक वाहने अडकलेली होती. रस्ता दोन्ही बाजूंना पडलेल्या दरडींमुळे ठप्प झाला होता तसेच पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने अडकलेल्या वाहनांना दोन्ही बाजूने जाता येत नसल्याने अडकून पडली होती. प्रवाशांना आसपास कोणतीही सोय नसल्याने दरड हाटवेपर्यंत तेथेच ताटकळत बसावे लागले होते. उंबर्डे फाट्याजवळील असणाऱ्या हॉटेल जवळ २७ गाड्या अडकल्या आहेत. येथील हॉटेल ही बंद असल्यामुळे जवळपास ७० ते ८० लोक रात्रीपासून या बिना अन्नपाण्याची रखडली होती.

दुसरीकडे ताम्हिणी घाटातील डोंगरवाडी परिसरात रस्ता खचल्याची घटना घडल्याने पुणे –कोलाड मार्ग १५ दिवस वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. असे असले तरी वरंध घाट मार्गवर अनेक वाहने मार्गस्त होत आहेत. महाड ते कावळा गड या जिल्हा हद्दीत चार ठिकाणी मातीचे ओसरे खाली आल्याचे निदर्शनास आहे तर जिल्हा हद्दीत दोन्ही बाजूने अडथळा म्हणून दगड ठेवण्यात आले आहेत, मात्र या दोन्ही दगडाच्या मधून वाहने घालत प्रवासी प्रवास करत आहेत.

# माथेरानच्या शारलोट तलावातील पाणी गढूळ

## साथीचे आजार बळावण्याची शक्यता

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहरात सध्या शारलोट तलावामधून पाणीपुरवठा केला जात आहे. तलावामधील पाणी शहरात सोडले जात असून यंदाही तलाव गाळ मुक्त न केल्याने गढूळ पाणीपुरवठा होत असून या पाण्यामुळे साथीचे आजार बळावण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

माथेरान मध्ये ब्रिटिश काळात शारलोट तलाव बांधण्यात आला. या तलावातून पाण्याचा पुरवठा शहरातील नागरिकांना होत होता. माथेरान हे थंड हवेचे ठिकाण आणि पर्यटनस्थळ म्हणून विकसित झाल्याने पर्यटकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे माथेरानमधील नागरिकांना, हॉटेल व्यावसायिक व अन्य



व्यावसायिक यांना पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी उल्हास नदीवरूनदेखील पाण्याचा उपसा केला जातो, मात्र पावसाळ्यात उल्हास नदीवरून पाणी उपसा बंद ठेवण्यात येत आहे शहरात असलेल्या शारलोट तलावातून पाणी उचलले जात आहे.

मागील बारा वर्षे शारलोट तलावाची स्वच्छता झाली नसून तलावात गाळाचे प्रमाणे अधिक झाले आहे.माथेरान शहरात सध्या सुरू असलेल्या पावसामुळे शारलोट तलावातून नळावाटे येणारे पाणी हे दूषित आणि गढूळ येत आहे. माथेरान शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाण्याचा पुरवठा करत असून पावसाळा असल्याने आणि तलावाची स्वच्छता न झाल्यामुळे शारलोट तलावामधील पाणी पूर्णपणे गढूळ आहे. तेच पाणी स्थानिकांना नळावाटे दिले जात आहे. त्यामुळे शहरात साथीचे आजार बळावण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, शारलोट तलावामधून पाणी उचलून जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून पुढे वितरित केले जात आहे, असे प्राधिकरणाचे म्हणणे आहे.

# नागोठण्यात पूरग्रस्तांसाठी पाण्याच्या जारचे वाटप

**नागोठणे : बातमीदार**

खासदार सुनील तटकरे यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्त रोहा पंचायत समिती सदस्य संतोष कोळी व राष्ट्रवादीचे नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी यांच्या पुढाकाराने पूरग्रस्त कुटुंबांना पाण्याच्या जारचे वाटप करण्यात आले.

नागोठणे येथील कोळीवाडा, बंगल्याची आळी व मोहल्ला या पूरग्रस्त भागांतील प्रत्येक कुटुंबाला एक पाण्याचा जार देण्यात आला. पुरानंतर निर्माण झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

यावेळी वेलशेत येथील श्री जखमाता अ‍ॅक्वा सेंटरचे मालक मनोज ताडकर यांनी समृद्धी कोळी व संतोष कोळी यांच्या छायाचित्राचे स्टिकर असलेले जार घेणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला २० लिटर शुद्ध पाणी सलग १० दिवस मोफत उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा केली.

माजी उपसरपंच अखलाक पानसरे, ज्येष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत कोळी, अतुल काळे, मनोज टके, रोशन पारंगे, विजय पारंगे, अंकुश ताडकर, शाहिर पुंडलिक ताडकर, मनोज ताडकर, प्रमोद चोरगे, सम्राट ताडकर, श्याम पाटील, घनश्याम ताडकर, रयान पानसरे व कार्यकर्ते उपस्थित होते.



# रहदारीला अडथळा आणणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी लोकांना गर्दीचा व ट्रॅफिक जामचा त्रास होऊ नये, चारचाकी वाहनांची क्षमता पाहून रस्ता मोकळा असावा यासाठी रस्त्यावरील उभी केलेली वाहने बाजूला असावी जेणेकरून वाहतकीस कोणालाही त्रास होऊ नये यासाठी मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार आज शहरातील विविध ठिकाणी वाहन चालक यांच्या विरोधात कडक भूमिका घेण्यात आली.

मुरूड शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी मुरूड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या



मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिस नाईक किशोर बठारे यांनी रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकांविरोधात विशेष कारवाई मोहीम राबवली. शहरातील मुख्य बाजारपेठ, आझाद चौक तसेच गर्दीच्या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने वाहने उभी करणाऱ्या आणि वाहतुकीत अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान अनेक वाहनांवर ई–चलानद्वारे ऑनलाईन दंड आकारण्यात आला. वाहतूक नियमांचे पालन करावे, नो–पार्किंग क्षेत्रात वाहने उभी करू नयेत आणि इतर वाहनचालकांना तसेच नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन ट्राफीक पोलिस नाईक किशोर बठारे यांनी केले आहे.

शहरातील वाहतूक शिस्तबद्ध राहावी आणि नागरिकांना विनाअडथळा प्रवास करता यावा, यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या कडुन सांगण्यात आले.या मोहिमेत पोलिस नाईक किशोर बठारे, पोलिस हवालदार चंद्रकांत जैतु, पोलिस शिपाई राकेश गायकवाड, होमगार्ड किरण देशमुख,स्वप्निल बरंबे आदिंसह पोलिस शिपाई सहभागी होते.

# सुधागड महागावमध्ये माश्यांचा उपद्रव


## तातडीने फवारणी करण्याची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील महागाव ग्रामपंचायत हद्दीत गेल्या काही दिवसांपासून माश्यांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे. यामुळे स्थानिक ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी तातडीने फवारणी करण्याची मागणी केली आहे.

सध्या महागाव परिसरातील घरे, व्यावसायिक दुकाने, हॉटेल्स आणि सार्वजनिक ठिकाणी माश्यांचे मोठे साम्राज्य पाहायला मिळत आहे. यामुळे अन्नपदार्थ दूषित होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. घरात कुठेही बसणे अथवा जेवणेही माश्यांमुळे कठीण झाले असून, व्यावसायिक देखील यामुळे कमालीचे त्रस्त झाले आहेत.

पावसाळ्याचे दिवस असल्याने आधीच ठिकठिकाणी अस्वच्छता आणि दमट वातावरण आहे. त्यातच माश्यांच्या या



वाढत्या सुळसुळाटामुळे परिसरात कॉलरा, डायरिया आणि इतर पोटाचे विकार यांसारख्या साथीच्या आजारांची लागण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीच आजारी असलेल्या रुग्णांना बसत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, माश्यांचा उपद्रव एवढा वाढला असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. औषध फवारणी किंवा स्वच्छता मोहिमेसारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याबाबत प्रशासन ुस्त असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महागाव परिसरात संभाव्य आरोग्य आणीबाणी किंवा मोठी रोगराई पसरण्यापूर्वी ग्रामपंचायत प्रशासनाने या समस्येची गंभीर दखल घेणे गरजेचे आहे.

गावात नियमित जंतुनाशक फवारणी करणे, साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आणि सामूहिक स्वच्छता मोहीम राबवणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने तात्काळ पावले उचलून महागाववासीयांना या त्रासातून मुक्त करावे, अशी आग्रही मागणी आता जोर धरू लागली आहे.

## आज माणगावात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन आज बुधवार दि.१५ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन माणगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

# खोपोली रोटरी क्लबकडून कलोते टेकडीवर वृक्षारोपण

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीतर्फे खालापूर तालुक्यातील कलोते या गावातील टेकडीवर ११०० विविध जातीचे वृक्ष लावण्यात आले

यावेळी खालापूर पोलिस्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप शिंगटे साहेब यांच्या हस्ते वृक्ष लाऊन त्याची पूजा करून श्रीफळ वाढवले यावेळी , रोटरी क्लब खोपोलीच्या अध्यक्ष कविता खोपकर, सेक्रेटरी रोहित भल्ला, निधी मॅडम, संतोष चव्हाण, माजी अध्यक्ष सुनीता चव्हाण, रो.संजय पाटील,मिलिंद बोधनकर, डॉ रवींद टिळक, अनिल खालापूरकर, राजेंद्र जगताप, राणे मॅडम, सुनील नांदे, होजाफा, लायन्स क्लब



माजी अध्यक्ष अविनाश राऊत, कासार साहेब, ताराराणी ब्रिगेडच्या अध्यक्ष वंदना मोरे, स्वामी नरेंद्र महाराज यांचे ७५ अनुयायी रोट्रक्ट क्लब खोपोली अध्यक्ष वैष्णव पाठक, सेक्रेटरी वागीश बहाते व सर्व सदस्य , पॉलिटेक्निकलचे प्राचार्य प्रशांत माने, विज्ञान भारती खोपोलीचे अध्यक्ष भरत देशमुख सर व सर्व सदस्य पॉलिटेक्निकलचे विद्यार्थी, कलोते ग्रामस्थ, ७० वर्षाची आजी या सर्वांनी ११०० वृक्ष लागवड केली.

# वर्षासहलीसाठी तरुणाईची फणसाड डॅमला पसंती

## सुरक्षिततेचा मात्र अभाव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला की तरूणाईला वेध लागतात ते वर्षासहलींचे, डोंगर कपाऱ्यातील वाहणाऱ्या धबधब्यातील धरणातील घावणारे पाणी अंगावर घेण्यासाठी आतुरलेली युवा मंडळी वर्षा सहलीचे प्लनिंग करतात, मुरूड तालुक्यात्तील फणसाड अरण्यातील डॅमला तरूणाईच्या उत्साहाचा बहर वर्षा सहलीच्या निमित्ताने पहावयास मिळतो.

मुरूड तालुक्यातील बोर्ली येथून अंदाजे ६ ते ७ किमी अंतरावरील वळणा वळणाच्या रस्त्याने जाऊन भोईघर गावावरून पुढे काजुवाडी, बेलवाडी गावाच्या पुढे डोंगरात फणसाड अरण्यातील डॅमवर जाता मेते. पावसाळी पाण्याने तुंडूब भरलेले धरण तसेच आजुबाजूच्या डोंगर कपारीतील मनमोहक दृष्य, धरणावरून काजुवाडी तसेच बेलवाडी गावासह धरणामुळे परिसरातील हिरवीगार शेतीतील नागरीचे दृश्य डोळ्यांना विलोभनिय निसर्गसोदर्यांनी भुरळ पाडते.

फणसाड धरणातून बोर्ली पंचक्रोशीतील २२ गावांना पाणीपुरवठा करते. शासनाच्या पाटबंधारे विभाग कोलाडच्या अखत्यारीत हे धरण असल्याचे सांगितले जाते. भोईवर



ग्रामपंचायतीला त्यांच्या हद्दीत असलेल्या फणसाड धरणाचे सोयरेसुतक नसल्याचे यथील ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे ग्रामपंचामतीमार्फत येथे सुविधा पुरविल्या जात नाही असे म्हटले जाते.

पावसाळी फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने मोठी गर्दी होते. मात्र अनेक सुविधाचा अभाव येथे आढळतो, बाहेरून वर्षा सहलीसाठी येणाऱ्या मंडळींना रस्त्यावर कुठेही मार्गफलक नसल्याने चुकीच्या मागनि जात नाही ना, अशी शंका मनात घेऊनच पुढे सरकावे लागते.

फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने तरूणाईची मोठी पंसती आहे. पावसाळ्यात दर शनिवार तसेच रविवारी मोठी गर्दी पहावयास मिळते. डोंगर कपारीत वसलेल्या निसर्ग सौंदर्याची मुक्त हस्ते उधळण असलेल्या परिसर यवा वर्गाला भावतो, मनमोकळेपणांनी एक वेगळा आनंद मिळविता मेतो. धरणातून वाहून जाणाऱ्या पाण्यात ओलेचिंब भिजत बसण्याची मज्जा काही औरच असते. नेहमीच दगदगीच्या जीवनातून वनडे पिकनिक म्हणून फणसाड डॅमचे महत्व पावसाळ्यांत दिवसेंदिवस वाढत आहे.

फणसाड धरण तुडूंब पाण्याने भरल्यानंतर वाहून जाणाऱ्या पाण्यात वर्षा सहली मंडळीची मौजमज्जा सुरु असते , परंतू धरणाच्या पाण्यात नदीचा प्रवाह जेथून असतो तेथे पाण्याचा खोलगट भाग असतो, परंतू येथे पाण्यात पोहणाऱ्यांसाठी धोक्याची कोणतीही निशाणी नाही, शिवाय कोणताही सुचना बोर्ड लावण्याचे सोयरसुतक दाखविले गेले नाही आहे. त्यामुळे अति उत्साहात असलेल्या वर्षा प्रेमी मंडळीच्या जीवीतास निश्चित धोका असून पुढे दुर्देवी घटना घडल्याचा संभव नाकारता येत नाही.

वर्षासहलींना येणाऱ्या मंडळीसाठी एकही दुकान अथवा पिण्याच्मा पाण्याची सुध्दा सोय रस्त्याने जाताना होत नाही. बेलवाडी व काजूवाडी येथून फणसाड धरणाच्या डॅमकडे डोंगरातून कच्चा रस्त्याने जावे लागते, डोंगरात असल्याने पक्का रस्ता पावसाच्या पाण्याने नित्याने वाहून जातो, परंतू तरीही रस्ता जाणे–येणे करीता सुयोम्म बनविले असते तर भोईघर ग्रामपंचामतीस वर्षा सहलीच्या निमित्ताने फणसाड डॅमसह भोईघर, काजुवाडी व बेलवाडी गावाना भेटी देणाऱ्यांची दुवा निश्चित मिळेल.

# संत बाळूमामांच्या दर्शनाला दर्श अमावास्येनिमित्त भाविकांची गर्दी

**चौक : प्रतिनिधी**

आज दर्श अमावास्या निमित्ताने लोणावळा पांगोळी येथील श्री संत बाळूमामा यांच्या दर्शनाला भाविकांची मोठी गर्दी झाली होती, यावेळी भंडारा प्रसाद घेण्यासाठी देखील मोठी गर्दी झाली होती.

ऑक्टोबर १८९२ मध्ये कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील अक्कोळ या गावी श्री संत बाळू मामा यांचा जन्म झाला.धनगर समाजात जन्मलेले बाळूमामा हे अवतारी पुरुष मानले जात. हे त्यांच्या दैवी शक्तीवरून दिसते,त्यांनी आयुष्यभर मेंढपाळ व्यवसाय केला आणि संपूर्ण आयुष्य समाजकल्याण व भक्तीमध्ये व्यतीत केले. ४ सप्टेंबर १९६६ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आदमापूर येथे त्यांनी जिवंत समाधी घेतली.

पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे असलेल्या श्रीसंत बाळूमामा मंदिरात आज दर्श अमावश्या असल्याने सकाळ पासून हजारो भाविक भक्तांनी उपस्थित राहून मामांचे दर्शन घेतले.लोणावळा पांगोळी येथे श्रीसंत बाळू मामा देवाचे भव्य मंदिर आहे.येथे गेल्या अनेक वर्षांपासून मंदिर असून या मंदिरात श्रीसंत बाळू मामांचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण राज्यातून भाविक भक्त दररोज मोठ्या संख्येने येत असतात.

येथे दर अमावश्येला या मंदिरात मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याचा महाप्रसाद असतो, आज दर्श अमावास्या असल्याने या मंदिरात सकाळ पासून हजारो भाविक भक्त उपस्थित राहून श्रीसंत बाळू मामांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.



# बिग बॅस लीगचे वेळापत्रक जाहीर

## भारतात होणार पहिला सामना

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाच्या बिग बॅस लीगचा १६वा सीजन लवकरच सुरु होणार आहे. बीबीएलकडून मंगळवारी (दि.१४) आगामी २०२६-२७चे वेळेपत्रक जाहीर करण्यात आले आहे. या हंगामाचे वैशिष्ट्य म्हणजे, यंदाच्या हंगामाचा पहिला सामना भारतात होणार आहे.

काही दिवसांपूर्वी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेले होते, तेव्हा त्यांनी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली होती. यावेळी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अल्बानीज यांनी घोषणा केली होती, की यंदाच्या बिग बॅस लीगचा पहिला सामना भारातातील




चेन्नईच्या ऐतिहासिक एम.ए चिंदबरम स्टेडियम (चेपॉक) येथे १२ डिसेंबर रोजी खेळला जाईल.

बीबीएलचा यंदाच्या स्पर्धेतील पहिला सामना भारतातील प्रसिद्ध चेन्नईच्या चेपॉक स्टेडियम येथे खेळला जाणार आहे. पहिल्या सामन्यात मेलबर्न रेनेगेड्स आणि पर्थ स्कॉर्चर्स यांच्यात लढत रंगणार आहे. या ऐतिहासिक सामन्यात मेलबर्न रेनेगेड्स संघाला होम टीमचा दर्जा देण्यात आला आहे. भारतात पहिल्यांदाच बीबीएलचा सामना आयोजित करण्यात आल्याने भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही दिवसांपूर्वी भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रेलियाचा दौरा केला. या दौऱ्याच्या अखेरीस पंतप्रधान मोदींनी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज, माजी कर्णधार स्टीव्ह वॉ आणि माजी महिला क्रिकेटपटू लिसा स्टॅसेकर यांच्या उपस्थितीत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मजबूत क्रिकेट संबंधांचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या चेन्नई येथे होणाऱ्या पहिल्या बीबीएल सामन्याचे स्वागत केले होते.

## सिक्सर किंग युवराजकडून वैभव सूर्यवंशीचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



टीम इंडियाचा माजी दिग्गज अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग याने भारताचा उदयोन्मुख १५ वर्षीय स्टार वैभव सूर्यवंशीला आपल्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. युवराजची तुलना आपला शिष्य आणि भारतीय टी-२० संघाचा सलामीवीर अभिषेक शर्मासोबत केली. एवढेच नाही तर वैभव हा त्याच्यापेक्षाही खतरनाक आहे, असे म्हटले आहे.

एका मजेशीर उदाहरणाद्वारे युवराजने स्वतःची आणि आपल्या शिष्यांची तुलना 'टर्मिनेटर' सीरिजशी केली. अभिषेक शर्माप्रमाणे वैभव सूर्यवंशीलाही आपल्या तालमीत घडवण्यासाठी तयार आहे, असे युवीने म्हटले आहे.

## एमसीए पंच चाचणी परीक्षेत रायगडातील ११ जण उत्तीर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वतीने जून महिन्यात घेण्यात आलेल्या चाचणी पंच परीक्षेमध्ये रायगड जिल्ह्यातील ११ पंच ८० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून मुख्य परीक्षेस पात्र ठरले आहेत.

अरुण ठाकूर, राहुल पाटील, रवींद्र म्हात्रे (उरण), ॲड. देवेंद्र मिश्रा, श्रीकांत पाटील (पेण), संकेश ढोले, मंगेश वार्डे (अलिबाग), सुरज देशमुख (रोहा), प्रवीण देशमुख (खालापूर), प्रणव सामंत, यश संकपाल (पनवेल) हे पंच चाचणी परीक्षेत उत्तीर्ण झाले. या सर्वांचे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) पदाधिकारी व सदस्यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या पुढाकारातून पंचांसाठी १०५ दिवसांचे मार्गदर्शन शिबिर (ऑनलाइन व प्रत्यक्ष) जूनपासून सुरू करण्यात आले. हे शिबिर ३० सप्टेंबरपर्यंत चालेल. मुख्य प्रशिक्षक व क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टांसह बीसीसीआयचे दोन पंच हर्षद रावले व रूपेश खडगी तसेच एमसीए मुंबईचे पंच राजन कसबे पंचांना मार्गदर्शन करत आहेत. आरडीसीएचे सदस्य तथा एमसीएचे पंच ॲड.पंकज पंडित व प्रशांत माळी यांना शिबिराच्या आयोजनाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## विजेत्यांचा पारितोषिकाने गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ तसेच रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेलमधील सिडको समाजमंदिरात झाली. महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनचे खजिनदार व स्कूल गेम चेअरमन शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा रंगली.

स्पर्धेत नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील नामवंत खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी.आर. साळसकर, शामल डेबार्मा आणि योगेश पवार यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

**गटनिहाय विजेते**

नवोदित : मुली-प्रथम इनाक्षी प्रुस्टी, द्वितीय अनुष्का जाधव, तृतीय स्नेहल जाधव व आध्या आनंद, मुले-प्रथम जस्तेज सिंह, द्वितीय श्रेसय पाठक, तृतीय मानस वर्तक व निर्माण कांबळे; ११ वर्षांखालील : मुली-प्रथम मीनाक्षी प्रुस्टी, द्वितीय स्नेहल जाधव, मुले-प्रथम विहान पुरोहित, द्वितीय रियान म्हात्रे; १३ वर्षांखालील : मुली-प्रथम धृती गोयल, द्वितीय अध्या आनंद, मुले-प्रथम अश्विक चव्हाण, द्वितीय विहान पुरोहित; १५ वर्षांखालील : मुली-प्रथम त्रिशा पावशे, द्वितीय रिया ठाकूर, मुले-प्रथम नील राठोड, द्वितीय अद्वित पाटील; १७ वर्षांखालील : मुली-प्रथम त्रिशा पावशे, द्वितीय देवी उन्मेष मोरे, मुले-प्रथम अद्वित गुप्ता, द्वितीय रेयांश शाहू; १९ वर्षांखालील : मुली-प्रथम रिया ठाकूर, द्वितीय ईश्वरी शितोळे, मुले-प्रथम अद्वित गुप्ता, द्वितीय नील राठोड; महिला खुला गट : प्रथम निकिता माने, द्वितीय शिरीन काळे; पुरुष खुला गट : प्रथम सागर कुलकर्णी, द्वितीय लोकेश पाटवा, तृतीय शामल डेबार्मा व मनीश सकलानी; पुरुष ज्येष्ठ गट : प्रथम मनीष सकलानी, द्वितीय विजय यादव.

## यशाचे श्रेय संघाच्या मेहनतीला आणि सपोर्ट स्टाफला -हरमनप्रीत कौर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने इंग्लंडचा लॉर्ड्स कसोटीत २७० धावांनी पराभव करत ऐतिहासिक विजय मिळवला. १४२ वर्षांत पहिल्यांदाच लॉर्ड्सच्या मैदानावर महिलांचा कसोटी सामना खेळवला गेला आणि भारताच्या महिला संघाने विजय मिळवत बाजी मारली. या ऐतिहासिक विजयानंतर कर्णधार कौरने प्रतिक्रिया दिली आहे.

हरमनप्रीत म्हणाली, संघाच्या या सातत्यपूर्ण कामगिरीचे श्रेय संपूर्ण संघाच्या मेहनतीला आणि विशेषतः आमच्या सपोर्ट स्टाफला जाते. त्यांच्यापैकी अनेकांनी भरपूर कसोटी क्रिकेट खेळले आहे. कसोटी क्रिकेटचा फ्लो कसा असतो याची त्यांना उत्तम जाण आहे. ते प्रत्येक क्षणी आम्हाला योग्य मार्गदर्शन करत होते. त्यामुळेच आम्हाला चांगली कामगिरी करता आली. अमोल सर आणि संपूर्ण सपोर्ट स्टाफने या कसोटीत तसेच याआधीच्या कसोटीत आम्हाला ज्या पद्धतीने साथ दिली, त्यासाठी मी त्यांचे मनापासून आभार मानते.

आमच्या सलामीवीरांनीच संघाची सर्वात मोठी ताकद असल्याचे पुन्हा सिद्ध केले आहे. त्यांनी डावाच्या पहिल्या टप्प्यात ज्या पद्धतीने फलंदाजी केली, ते पाहणे खरोखरच खास होते. त्या नेहमी जबाबदारी स्वीकारतात आणि आमच्यावरील दडपण कमी करतात. या कसोटी सामन्यातही त्यांची फलंदाजी अप्रतिम होती, असे हरमनप्रीतने नमूद केले.

अलीकडच्या निराशाजनक मालिकांनंतर संघाच्या पुनरागमनाबद्दल हरमन म्हणाली, गेल्या काही मालिका आमच्या अपेक्षेप्रमाणे गेल्या नाहीत, पण अशा काळातच गोष्टी विस्कटण्याची शक्यता जास्त असते. त्या परिस्थितीत आमच्या सपोर्ट स्टाफने संपूर्ण संघाला एकत्र ठेवण्याचे मोठे काम केले आहे.









श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर शिवाजीनगर

वर्ष २३ वे || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना २००३

पुण्यतिथी सोहळा


श्री समर्थ सद्‌गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)


श्री समर्थ सद्‌गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)


स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर


स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर


श्री समर्थ सद्‌गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४८, गुरुवार दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४८, शुक्रवार दिनांक १७/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

कार्यक्रम

| गुरुवार, दिनांक १६/०७/२०२६ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा) बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब (पुणे), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण),श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्यंभर भजन मंडळ, गव्हाण, गायक : हेमंत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर, गायीका : श्रीमती. हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत, श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर, गायीका : सौ. सुप्रिया घरत वादक : तुषार घरत, टाळकरी - सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर, गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर श्री. हर्षल फडके, पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ (कोपर), बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर) पखवाज : वैष्णव देशमुख |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | **प्रभोदनकार :** ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे, श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल), वादक : ह.भ.प. आदित्य पाटील, गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

| शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२६ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा), पखवाज : निलेश पाटील (कोपरा) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

* कार्यक्रमाचे ठिकाण *
श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

* व्यवस्थापक *
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावे- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

* संयोजक *
श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com